MULYA SHIKSHAN

मूल्यशिक्षण

❖ लेखक ❖

अफजल हुसेन

एम.ए.एल.टी.

❖ भाषांतर ❖

प्रो. अब्दुर्रहमान शेख

"अल्लाह, असीम, दयावंत व कृपावंतच्या नावाने"

मूल्यशिक्षण भाग १

प्रिय बाळांनो !

तुम्ही गोष्टी तर फार काही ऐकल्या असतील !
वानर आणि अस्वलांच्या गोष्टी सुध्दा !
आई कडून, आजी कडून, थोरल्या भावडांकडून,
तुम्ही गोष्टी ऐकत आला आहात !
गोष्टी मध्ये,
तुमची आवड मात्र पुष्कळ आहे !
तुमच्या ह्या आवडीला,
लक्षात ठेवून तुम्हांसाठी,
प्रिय गोष्टींचा, आवडत्या गोष्टींचा,
हा लहानसा संच आम्ही तयार केला आहे !
ह्या गोष्टींमध्ये,
तुमची करमणुक होईल आणि तुमची माहिती सुध्दा वाढेल !
ह्या गोष्टी सत्य गोष्टी आहेत
ह्यांत आदर्श जीवनाचे रंग आहेत !
आणि
मानवी स्वभावाचा सुगंध सुध्दा आहे !
ह्या गोष्टी फक्त गोष्टी नाहीत,
आमच्यासाठी मार्गदर्शक सुध्दा आहेत
प्रिय बाळांनो !
ह्या गोष्टींना वाचा जरूर,
आणि
तुम्हीस्वत: मानवी समाजाला मार्गदाखविणारे दीपस्तंभ बना !
हीच आमची इच्छा आहे !
ईश्वर तुमची मदत करो !

लज्जाशीलता

आदरणीय प्रेषित (स.) यांचे बालपण होते. काबागृहाची भिंत काहीशी पडली होती. लोक भिंतीची दुरुस्ती करत होते. लहान लहान मुलं सुध्दा काम करत होती. दगडांचे तुकडे आपल्या खांद्यावर वाहून आणत व भिंतीवर ठेवत. थोड्या वेळाने खांदे दुखू लागले तेव्हा तर चिमुकल्यांनी आपले अंगावरचे वस्त्र चुंबळ म्हणून वापरण्यास सुरुवात केली.

आदरणीय प्रेषित (स.) सुध्दा दगड वाहत होते. दगड वाहता वाहता खांदे दु:खू लागले. त्यांचे चुलते त्या ठिकाणी होते. ते म्हणाले, "बेटा ! तू सुध्दा आपले अंगावरचे वस्त्र काढून त्याची चुंबळ बनव म्हणजे तुझे खांदे दगड वाहतांना दुखणार नाहीत."

आदरणीय प्रेषित (स.) यांनी चुलत्याच्या आदेशानुसार वागण्याचे ठरविले परंतु आपले शरीर वस्त्रहीन ठेवण्याची निर्लज्जता त्यांना असह्य होती ! ते तर अत्यंत लाजाळू होते. लुंगी काढणे त्यांच्यासाठी अशक्य होते. ते लुंगी काढू लागताच लज्जेने बेशुध्द पडले. काकांनी जेव्हा हे पाहिले तर तसे न करण्यास सांगितले.

प्रश्न : १) मुलं दगड का वाहत होते ?

२) खांदे दुखू लागल्यानंतर मुलांनी काय केले ?

३) आदरणीय प्रेषित (स.) यांना काकांनी आदेश देता क्षणी काय घडले ?

मूल्य पाठ क्रमांक २

सलाम करणे

सलाम केल्याने प्रेम वाढते. उमर (र.) यांचे पुत्र अब्दुल्लाह (र.) ह्या गोष्टीला पूर्ण जाणून होते. आदरणीय प्रेषित (स.) यांना ते नेहमी इतर लहान मोठ्यांना सलाम करताना पाहात असत. खेळतांना मुलं समोर आली तर त्यांना सुध्दा लगेच सलाम करीत असत. ज्या गोष्टीला आदरणीय प्रेषित (स.) अंमलात आणत होते त्याला अबुल्लाह (र.) का म्हणून सोडून देतील ? म्हणूनच ते सुध्दा दुसऱ्याला सलाम करण्यासाठी तत्पर होते.

आदरणीय प्रेषित (स.) यांना जो कोणी भेटत असे त्याला ते सलाम करीत. त्यांना सलाम करण्याची सवय लागली होती. ते सलाम करण्यासाठी बाजारात जात आणि प्रत्येक दुकानदार प्रत्येक प्रवासी प्रत्येक गरीब आणि असहाय व्यक्तीला ते सलाम करत असत.

एके दिवशी एका व्यक्तीने विचारले, "महाशय ! आपण बाजारात येता परंतु भावटाव करीत नाही. किंवा काही खरेदी विक्री सुध्दा करीत नाही. कुठे थांबत सुध्दा नाही. मग कोणत्या कामासाठी आपण बाजारात येता?"

आदरणीय प्रेषित (स.) यांनी सांगितले, "मी बाजारात फक्त सलाम करण्यासाठीच येतो."

अब्दुल्लाह (र.) यांच्या मते बाजारात सलाम करण्यासाठी जाणे हे खरेदी विक्रीसाठी बाजारात जाण्यापेक्षा कमी महत्वाचे काम नाही.

प्रश्न : १) अब्दुल्लाह (र.) बाजारात कशासाठी जात ?

२) सलाम करण्यात काय फायदे आहेत ?

३) सलामसाठी काय शिष्टाचार आहेत ?

मूल्यपाठ क्रमांक ३

आईवडिलांची सेवा

माननीय शरफुद्दीन (रह.) एक बुजूर्ग व्यक्ती होते. ते आपल्य आईवडीलांचा फार आदर करीत. नेहमीच त्यांचा आदेश पाळत आणि सतत त्यांच्या सेवेसाठी तत्पर राहत असत. एक दिवसाची गोष्ट त्यांच्या मातोश्री पलंगावर पडून होत्या. त्यावेळी शरफुद्दीन (रह) बालवयातच होते. पलंगावर आराम करतांना आईला तहान लागली. मुलाला सांगितले की "बेटा ! मला तहान लागली आहे. जरा एक ग्लास पाणी आण." ते ग्लास घेवून माठातून पानी भरून आणे पर्यंत आईला झोप लागून गेली. आता काय करावे ? झोपेतून उठविले तर आईला त्रास होईल म्हणून उठविणे योग्य नाही. आपल्या हातात पाण्याने भरलेला ग्लास घेवून ते आईच्या उशाशी ताटकळत उभे राहिले की आईला जाग येताच तिने पाणी मागितले तर लगेच देता यावे. मध्य रात्र उलटली ते तशाच प्रकारे पानी घेवून उभे राहिले. शेवटी आईने डोळे उघडले. काय पहाते की चिरंजीव हातात पाण्याने भरलेला ग्लास घेवून उभे आहेत.

"बेटा ! काय तू त्या वेळेपासून आतापर्यंत असाच उभा आहे?" आईने विचारले.

"होय मातोश्री ! मी त्यावेळेपासून तुझ्या उशाशी उभा आहे की तुला जाग यावी आणि मी पाणी द्यावे" चिरंजीवाने अदबीने सांगितले. हे उत्तर ऐकून मातोश्री अत्यंत खुश झाल्या. गुणी मूलाला आशिर्वाद दिला. परिणामत: मोठेपणी शरफुद्दीन (रह) अल्लाहचे मोठे वली (दोस्त) बनले.

प्रश्न : १) ह्या गोष्टीला आपल्या शब्दात सांगा ?

२) तुम्ही आपल्या आईवडीलांची काय सेवा करता ?

मूल्य पाठ क्रमांक ४

गुरुजनांचा आदर

हारून रशीद एक मोठा सम्राट होवून गेला. त्याची दोन मूलं होती. एकाचे नाव आमीन आणि दुसऱ्याचे मामून नाव होते. एके दिवशीची गोष्ट आहे दोघेही आपल्या गुरुजवळ बसून गुरुपाठ घेत होते. काही कारणामुळे गुरुला आपल्या जागेवरून उठावे लागले. ते उठणार तेव्हा दोन्ही मुलं गुरुजींचे पादत्राणे सरळ करण्यासाठी धावले. पादत्राणांजवळ येवून दोघे भांडू लागले. प्रत्येकाला वाटे की गुरुर्जीचे पादत्राणं स्वत: सरळ करावे. गुरुर्जींनी भांडण अशा प्रकारे मिटविले की एक मुलगा एक पादत्राण सरळ करेल आणि दुसरा मुलगा दुसरे पादत्रांण सरळ करील. दोघांनी गुरुर्जींचे पादत्राणं सरळ व्यवस्थित केले आणि गुरुर्जी पादत्राण घालून बाहेर पडले.

जेव्हा सम्राट हारून रशीद यांना ह्या गोष्टीची खबर लागली तेव्हा ते फार खुश झाले. दोघा मुलांना दरबारात बोलावून खूप बक्षीस दिले. मोठेपणी हीच मुले पुढे सम्राट बनली.

प्रश्न : १) दोन्ही राजपूत्रांनी गुरुजीची काय सेवा केली ?

२) राजाने ऐकल्यावर काय केले ?

३) तुम्ही आपल्या गुरुची सेवा कशी करता ?

मूल्यपाठ क्रमांक ५

थोरांचा आदर

एका दिवसाची गोष्ट आहे. अल्लाहचे प्रेषित (स.) यांच्या जवळ अबू बकर (र) आणि उमर (र) बसलेले होते. प्रेषित (स.) यांनी प्रश्न विचारला.

"तो वृक्ष कोणता आहे जो गुण वैशिष्टयांमध्ये मुस्लिमांशी मिळता जुळता आहे. दरवर्षी फळ धारण करतो आणि सतत हिरवागार राहतो?"

दोघा महाशयांना उत्तर देता आले नाही. उमर (र) यांचे सुपुत्र अब्दुल्लाह (र) सुध्दा तेथे उपस्थित होते. त्यांनी त्वरित उत्तर हेरले. त्यांना वाटले की त्वरित उत्तर द्यावे की तो वृक्ष खजुरीचा वृक्ष आहे. परंतु त्यांचे पिता आणि अबू बकर (र) शांत होते. म्हणून त्यांनी उत्तर देणे त्यांचा अनादर करणे समजले आणि गप्प बसून राहिले. उमर (र) यांना हे माहित झाल्यावर त्यांनी पुत्राला विचारले, "हे पुत्र! तुला माहित होते तर का उत्तर दिले नाही? तू त्यावेळी उत्तर दिले असते तर मी फार खुश झालो असतो. जो प्रश्न अनुत्तरित राहिला त्याचे उत्तर माझ्या मुलाने दिले. यावर अब्दुल्लाह (र) यानी अदबीने सांगितले,

"पिताश्री ! जेव्हा आपण आणि माननीय अबू बकर (र) गप्प होते. तेव्हा मी कसा बोलणार ! आपणा थोरांचा अनादर झाला असता म्हणून मी गप्प बसून राहिलो.

माननीय उमर (र) आपल्या पुत्राच्या ह्या उत्तराने फार खुश झाले.

प्रश्न : १) माननीयउमर (र) यांची आपल्या पुत्राशी काय बातचीत झाली?

२) माननीय अब्दुल्लाह (र) उत्तर माहित असून सुध्दा गप्प बसून का राहिले?

मूल्यपाठ क्रमांक ६

लहानग्यांशी प्रेम

फार दिवसाची गोष्ट आहे जेव्हा शेळ्या मेंढ्या सारखी माणसं विकली जात असत. काही वाईट लोकांनी लहानशा मुलाला पकडून बाजारात विकावयास आणले.

मातोश्री खदीजा (र) यांना हे कळल्यानंतर त्यांना फार वाईट वाटले. त्या लहानग्याला त्यांनी विकत घेतले आणि आदरणीय प्रेषित (स.) यांच्या जवळ मुलाला घेवून गेले.

आदरणीय प्रेषित (स.) लहान मुलांशी फार प्रेम करत. ह्या मुलावर तर त्यांचे अधिकच प्रेम जडले होते. कारण त्या लहानग्याला त्याच्या आई वडीलापासून बदमासांनी दूर केले होते. प्रेषित (स.) यांच्या शिवाय इतर कोणीच पालक नव्हता. प्रेषितांनी मुलांवर फार प्रेम केले. तो मुलगा सुध्दा प्रेषित (स.) यांच्याशी मिसळून गेला होता. तो मुलगा सतत प्रेषित (स.) यांच्या बरोबरच राहत असे. प्रेषित (स.) यांनी त्या मुलाला लाडाने लहानचे मोठे केले.

काही काळानंतर मुलाच्या वडीलांना मुलाचा ठावठिकाणा कळला. तो मुलाच्या शोधात प्रेषित (स.) यांच्याकडे आला. जेव्हा त्याला कळले की मातोश्री खदीजा (र) यांनी मुलाला विकत घेतले आहे. तेव्हा तो किंमत देवून आपल्या मूलाला परत मागू लागला. आदरणीय प्रेषित (स.) किंमत कशी स्वीकारतील? त्यांनी किंमत न घेता मुलाला आझाद केले आणि सांगितले,

"मुलाला जिथे राहावयाचे असेल तिथे तो राहू शकतो."

आदरणीय प्रेषित (स.) यांनी मुलाला अतिप्रेमाने पाळले होते. चांगल्या चांगल्या गोष्टी त्याला शिकवल्या होत्या. लाडाने संभाळत होते. तो मुलगा प्रेषित (स.) यांना सोडून जाऊ शकत नव्हता. इतक्या लाडाने आणि प्रेमाने संभाळ करणारा त्याला दुसरा कुठे भेटला असता? त्या मुलाने आदरणीय प्रेषित (स.) यांच्या पायांना घट्ट पकडून ठेवले आणि प्रेषित (स.) यांना सोडून त्याच्या पित्याबरोबर जाण्यास तयार झाला नाही. शेवटी नाविलाजाने वडील परत गेले. वडील खुष होते कारण मुलाचा संभाळ अशा जागी होत आहे जिथे त्याचे पालनपोषण आणि शिक्षण त्या ठिकाणी अधिक चांगले होत आहे.

प्रश्न : १) मुलगा आपल्या वडीलांसोबत का गेला नाही ?

२) वडील कोणता विचार करुन खुष होते ?

मूल्य पाठ क्रमांक ७

पशुवर दया

एकदा एक सहाबी (र) म्हणजे प्रेषित (स.) यांचे सोबती कुठेतरी जात होते. काही अंतरावर गेल्यानंतर रस्त्यात एक वनराई दिसली.

झाडांमधून चूंचूं असा आवाज येऊ लागला. आवाज ऐकून ते सहाबी वनराईत घुसले. तिथे त्यांना चिमणीची पिल्ले दिसली. ती पिल्लं इतकी लहान होती की उडू शकत नव्हती. चिमणीच्या पिल्लांना पाहून सहाबी (र) फार खुश झाले. त्या सर्व पिल्लांना उचलून एका चादरीत ठेवून बाहेर पडले. थोड्याच वेळात चिमणी तिथे चोचीत चारा घेऊन आली. पिल्लं चादरी खाली चूँचूँ करीत होती. चिमणीला समजून चुकले की हाच मनुष्य आपल्या पिल्लांना घेऊन चालला आहे. चिमणी बेचैन होऊन त्याच्या डोक्यावर घिरट्या घालू लागली. सहाबी (र) यांनी चिमणीच्या ओरडण्याकडे लक्ष दिले नाही. आणि त्या चिमणीच्या पिल्लांना चादरीत घेऊन प्रेषित (स.) यांच्याकडे घेवून आले.

चिमणीच्या लहान पिल्लांना पाहून प्रेषित (स.) यांना दया आली विचारले, "ही पिल्लं तुम्हाला कुठे सापडली? सहाबी (र) यांनी सर्व वृत्तांत ऐकविला आदरणीय प्रेषित (स.) अत्यंत दयाळु होते. पिल्लांना आईपासून दूर करणे आणि अशा प्रकारे आई व पिल्लांना त्रास देणे प्रेषित (स.) यांना आवडले नाही. आदेश दिला, "जा ह्या पिल्लांना त्यांच्या जागी सोडून या." सहाबी (र) गेले आणि पिल्लांना वनराईत त्यांच्या जागी सोडून आले.

प्रश्न : १) सहाबी (र) यांनी चिमणीची पिल्लं कशी पकडली?

२) आदरणीय प्रेषित (स.) यांनी जेव्हा पिल्लांना पाहिले तर कोणता आदेश दिला?

३) पशु बरोबर कशा प्रकारे वागावे?

४) तुम्ही एखाद्या पशुबरोबर चांगला व्यवहार केला आहे का?

मूल्य पाठ क्रमांक ८

वडीलधाऱ्यांना धर्मपाठ देणे

एका दिवशी माननीय हसन (र) आणि हुसेन (र) यांच्या घरी एक खेडुत आला होता. त्यावेळी ही दोघं भावंडं लहान मुलं होती. खेडुत अशिक्षित होता. सुचिर्भूत होण्याची (वजू) पध्दत सुध्दा त्याला ठावूक नव्हती. नमाजची वेळ झाली होती. खेडुत वजू करण्यासाठी (सुचिर्भूत होण्यासाठी) बसला परंतु माहिती नसल्यामुळे उलटसुलट वजू करू लागला.

ह्या दोघा भावंडांनी हे पाहिले. धर्माचा विषय होता. चुकीची दुरुस्ती होणे आवश्यक होते. परंतु त्या खेडुताला कसे सांगावे ? खेडुत ह्या दोघांपेक्षा वयाने फार मोठा होता. वडील धाऱ्यांना उघड उघड त्यांची चुक दाखवून देणे त्यांचा अनादर आहे. खेडुताला वाईट वाटले असते.

शेवटी दोघा भावंडांना एक युक्ती सुचली. तांब्या मध्ये पाणी घेवून वजू करू लागले आणि खेडुताला अदबीने सांगू लागले.

"महाशय, आम्ही दोघे भाऊ वजू करीत आहोत. जरा लक्ष द्या की आम्ही वजू व्यवस्थित करतो की नाही? चुक झाली तर कृपया दाखवून द्या."

असे सांगून दोघांनी योग्यरित्या वजू केला. खेडुत लक्षपूर्वक पाहू लागला. त्याच्या लक्षात आले की वजू करण्याची योग्य पध्दत काय आहे.

अशा प्रकारे दोघा भावंडांनी आपल्याशी वयाने मोठ्या व्यक्तीला धर्माची एक योग्य पध्दत दाखवून दिली. पुण्यप्राप्ती सुध्दा झाली आणि खेडुत नाराज सुध्दा झाला नाही.

प्रश्न : १) खेडुत कशा प्रकारे वजू करीत होता?

२) हसन (र) आणि हुसैन (र) यांनी त्याला कशा प्रकारे समजावून दाखविले?

३) थोरामोठ्याना धर्म कशाप्रकारे शिकवावा?

मूल्यपाठ क्रमांक ९

सेवाभाव

मुस्लिमांमध्ये अनेक असे आदर्श खलिफा होवून गेलेत ज्यांचा दर्जा आजच्या राजांपेक्षा तसेच कमांडरां पेक्षा अतिउच्च होता. परंतु ते अत्यंत साधी राहणी जगले. आपल्या सुख समाधानावर ते अत्यल्प खर्च करत असत.

असेच एक खलिफा (र) माननीय उमर बीन अब्दूल अजीज (र) होते. हे महान धर्म सेवक होते. एका रात्री ते झोपले असता घाम फार येऊ लागला. उन्हाळ्याचे दिवस होते. दासी पंखा हलवित होती. पंखा देत दासीला सुध्दा झोप लागली. खलिफा जागे झाले. दासीच्या हातून पंखा घेतला आणि स्वत: तिला पंखा देऊ लागले.

थोड्या वेळाने दासीचा डोळा उघडला. खलिफांना पंखा देतांना तिने पाहिले आणि अत्यंत खजील झाली. खलिफा म्हणाले,

"घाबरू नकोस, तू सुध्दा माझ्यासारखीच मानव आहेस. मी जेव्हा गरमीपासून त्रस्त होतो तेव्हा तू पंखा हलवून मला आराम दिले. जेव्हा तुला घाम येऊ लागला तेव्हा मी पंखा देऊ लागलो. यात वाईट काय आहे ?

प्रश्न : १) माननीय उमर बीन अब्दूल अजीज (र) कोण होते?

२) त्यांनी आपल्या दासी बरोबर काय वर्तन केले?

३) दासी खजील झाल्यावर ते काय म्हणाले?

मूल्यपाठ क्रमांक १०

शेजारधर्म

आदरणीय प्रेषित (स) यांच्या साथीदारांना सहाबा (र) म्हटले जाते. प्रेषित (स.) यांचे एक सहाबी माननीय अब्दुल्लाह (र) होते. ते फार पुण्यशील आणि अल्लाह आणि प्रेषित (स) यांचे पूर्ण आज्ञांकित होते.

एके दिवशी अब्दुल्लाह (र) यांचे घरी शेळी जुबाह (कापणे) केली गेली. त्यांच्या शेजारी एक यहुदी राहत असे. त्या दिवशी अब्दुल्लाह (र) संध्याकाळी बाहेरून घरी आले तर घरातल्या लोकांना विचारले की "काय तुम्ही शेजाऱ्याला मटन नेऊन दिले? घरातील लोकांनी उत्तर दिले," ते यहुदी आहेत, त्यांना का म्हणून द्यावे?

"यहुदी आहे म्हणून काय झाले? तो तर आमचा शेजारी आहे." माननीय अब्दुल्लाह (र) यांनी उत्तर दिले. अल्लाहचे प्रेषित (स.) यांनी अनेकदा ताकिद दिली आहे की,

"शेजाऱ्याशी चांगले वागा. शेजारी मुस्लिम असो की मुस्लिमेतर असो."

माननीय अब्दुल्लाह (र) यांनी जेवण घेतले नाही यहुदीच्या घरी मटन पोहच केल्यानंतरच माननीय अब्दुल्लाह (र) यांनी जेवण घेतले.

प्रश्न : १) सहाबी कोणास म्हणतात?

२) घरातील लोकांना मटन का दिले नाही?

३) मांननीय अब्दुल्लाह (र) यांनी काय उत्तर दिले?

४) शेजाऱ्याविषयी काय आदेश आहे?

बदला घेवू नका

एकदा जिहाद (धर्मयुध्द) मध्ये माननीय अली (र) यांचा मुकाबला शत्रुशी झाला. माननीय अली (र) फार शूर होते. शत्रू सुध्दा चांगलाच दांडगा होता. परंतु अली (र) यांच्याशी तो काय मुकाबला करणार? युध्दात अली (र) यांनी शत्रूलाचारी मुडंया चीत केले आणि त्याच्या छातीवर बसले. तलवारीने त्याचे शीर धडा वेगळे करणारच तेव्हढ्यात त्याने अली (र) यांच्या तोंडावर थुंकले.

शत्रूच्या थूंकण्यामुळे ते त्याच्या छातीवरून उठून बाजूला उभे राहिले आणि सांगितले,

''जा आता मी तुला ठार करू शकत नाही. आता पर्यंत मी तर धर्मासाठी लढत होतो. आता जर तुला ठार केले तर त्यात माझ्या रागाचा सुध्दा भाग राहिल. आणि शक्य आहे अल्लाहजवळ हे कृत्य बदल्याचे कृत्य म्हणून नोंद होईल. तू माझी बेइज्जती केलीस मी ह्याचा बदला घेऊ इच्छित नाही. आपल्या स्वार्थासाठी एखाद्याला ठार करणे बहादुरी नव्हे तर कमजोरी आहे.

तो मनुष्य अली (र) यांच्या ह्या वर्तनामुळे फार प्रभावित झाला आणि त्याने इस्लाम धर्म स्वीकार करून मुस्लिम बनला.

प्रश्न : १) ह्या गोष्टीला आपल्या भाषेत सांगा ?

२) माननीय अली (र) यांनी शत्रूला का सोडले ?

३) त्यांच्या वागणुकीचा काय परिणाम झाला ?

गुपित लपवणे

माननीय अनस (र) एक महान सहाबी होऊन गेले. लहानपणापासूनच ते पुण्यशील होते. एके दिवशी ते मुलांसह खेळत होते. अल्लाहचे प्रेषित (स.) त्याठिकाणी आले. मुलांना त्यांनी सलाम केला. अनस (र) यांना बोलावून कामासाठी दुसरीकडे पाठविले. त्या कामाला पूर्ण करण्यासाठी त्यांना बराच वेळ लागला. घरी आल्यानंतर आईने विचारले.

"अनस (र) तू इतका वेळ कुठे गेला होतास?"

"प्रेषित (स.) यांनी एका कामासाठी पाठविले होते" माननीय अनस (र) यांनी उत्तर दिले.

"ते काय काम होते ?" आईने विचारले.

"ते एक गुपित काम होते." त्यांनी आईला उत्तर दिले.

त्यावर आईने बजावले की, "बेटा! गुपितं कुणाला सांगत जाऊ नकोस."

माननीय अनस (र) यांनी ही गोष्ट चांगलीच लक्षात ठेवली आणि जीवनात कधीही गुपित कुणापुढे सांगितले नाही. माननीय साबीत (र) अनस (र) यांचे परममित्र होते. एक दिवशी ह्या घटनेची त्यांनी आपल्या मित्राशी विचारणा केली.

त्यावर अनस (र) म्हणाले, "मित्रा ! मी ते गुपित कुणाला सांगितले असते तर तुला जरूर सांगितले असते."

प्रश्न : १) माननीय अनस (र) यांनी आईजवळ काय सांगितले?

२) माननीय साबित (र) कोण होते ?

३) त्यांनी मित्राला काय सांगितले ? आणि का?

मूल्यपाठ क्रमांक १३

दान स्वीकारण्यापासून दूर राहा

एके दिवशी आदरणीय प्रेषित (स.) यांच्याकडे दान म्हणून काही खारकं आली. लोक दानवस्तू प्रेषित (स.) यांच्याकडे पाठवित असत. त्या दानातील वस्तू ते आणि त्यांचे घरातील लोक कधीच स्वत:साठी वापरत नसत. त्या सर्व दान म्हणून आलेल्या वस्तू प्रेषित (स.) गरीबांना वाटून देत असत.

ह्यावेळी ज्या खारका आल्या होत्या त्यांचे वाटप अद्याप झाले नव्हते. त्या सर्व खारका एका खिडकीत ठेवल्या होत्या. संयोगाने माननीय हुसैन (र) तिथे आले. ते त्यावेळी वयानं लहान होते. त्यांना त्यावेळी हे सुध्दा माहित नव्हते की प्रेषित (स.) यांनी दान वस्तुंचा वापर करण्यास घरातील लोकांना मनाई केली आहे. लहान मुल तर होते ते! पटकन खिडकीत चढले आणि एक खारीक घेवून तोंडात टाकली. प्रेषित (स.) यांनी ते पाहिल्यावर सांगितले.

"बेटा ! ती खारीक तोंडातून काढून फेकून दे. आपल्यासाठी दानवस्तू ताज्य आहे."

"माननीय हुसैन (र) यांनी तोंडात टाकलेली खारीक बाहेर काढून फेकून दिली.

प्रश्न : १) दान वस्तूंचे प्रेषित (स.) काय करत?

२) माननीय हुसैन (र) यांनी काय केले?

३) प्रेषित (स) यांनी खारीक का फेकून देण्यास सांगितले?

नेहमी सत्य बोला

आपल्या आईने तुम्हाला मोठ्या पीरसाहेबांचे (थोर संताचे) नाव तर सांगितलेच असेल. त्यांचे नांव होते शेख अब्दूल कादीर (रह.) ते जिलान शहरातील राहणारे होते. ह्याचमुळे त्यांच्या नावापुढे जिलानी असे लिहीले जाते.

अल्लाहची कृपा त्यांच्यावर होवो. हे थोर संत आणि अल्लाहवाले मनुष्य होते. लहाणपणीच त्यांच्या वडीलांचे निधन झाले होते. लहाणपणापासूनच त्यांना लिहिण्यावाचण्याचा छंद होता. त्यांना माहित होते की बगदाद शहरात थोर धर्म पंडितांचे वास्तव आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना बगदाद येथे जाण्याची ओढ लागून होती. बगदाद जाण्यासाठी आपल्या आईजवळ आग्रह धरला. आई तयार झाली.

त्याकाळी आजच्या सारखा प्रवास सुखकर नव्हता. पाई चालावे लागत होते किंवा जनावरांच्या पाठीवर स्वार होवून प्रवास करावा लागत असे. रस्त्यात लुटमारीचा सुध्दा धोका नेहमी राहत. ह्याचमुळे लोक काफिला करून प्रवास करत असत.

बगदाद जाणाऱ्या एका काफील्या बरोबर त्यांनी प्रवासाला सुरवात केली. आईने चाळीस दीनार शर्टाच्या आतून शिवून सुरक्षित ठेवून दिले जेणे करून चोरी होऊ नये. आणि मुलाला ताकीद केली की, "बेटा ! कसेही संकट आले तरी किंवा जीवावर बेतले तरी खोटे कधीही बोलू नकोस."

काफीला रवाना झाला. अब्दुल कादीर (रह.) सुध्दा बरोबर होते. काही अंतर कापल्यानंतर काफील्यावर डाका पडला. काफीला लुटला गेला. एका डाकूने त्यांना विचारले.

"हे मुला ! तुझ्याजवळ काय आहे?"

अब्दुल कादीर (रह) यांनी डाकूला उत्तर दिले, "होय चाळीस दीनार आहेत." त्या मुलाचा साधा पोशाख पाहून डाकूला विश्वास बसला नाही. त्याला वाटले हा मुलगा माझी चेष्टा करत आहे. अशाच प्रकारे बऱ्याच डाकूंशी त्यांच्या वार्तालाप झाला. सर्वांनी विचारल्यावर त्या मुलाचे हेच उत्तर होते, "होय माझ्याजवळ चाळीस दीनार आहेत."

शेवटी डाकूंच्या सरदाराने दखल घेतली. त्याने विचारले, "कुठे आहेत ?" मुलाने उत्तर दिले, "माझ्या शर्टाच्या आतून काखेखाली शिवून ठेवलेले आहेत."

डाकूने शर्ट फाडून पाहिला तर खरोखरच चाळीस दीनार निघाले. त्यावर डाकूंचा सरदार आश्चर्यचकित झाला आणि मुलाला विचारले,

"बेटा ! ज्याला हरवण्याच्या भीतीपोटी इतके सुरक्षित लपवून ठेवले होते. त्याला तू आम्ही विचारल्यावर का खरे सांगितले ?"

"माझ्या आईने निघतांना मला ताकीद केली होती की कितीही संकटे आली तरी खोटे बोलू नकोस. मी आईचा आदेश कसा मोडेल?" मुलाने उत्तर दिले.

त्याच्या ह्या म्हणण्याने सरदार फार प्रभावित झाला. त्याने विचार केला की इतक्या लहान मुलास आईच्या आदेशाची इतकी काळजी आहे आणि मी आहे की अल्लाह आणि प्रेषित (स.) यांच्या आदेशा विरुध्द कृत्य करत आहे. सरदार आणि त्याच्या टोळीच्या सर्व डाकूंनी त्वरित क्षमा मागितली. सर्व लुटलेला माल काफील्यातील लोकांना परत देवून टाकला आणि सर्व नेक बनून राहिले.

प्रश्न : १) मोठ्या पीरसाहेबांचे नाव काय होते ?

२) शिक्षणासाठी कुठे जात होते? रस्त्यात काय घडले?

३) त्यांच्या सत्य बोलण्याचा काय परिणाम झाला?

मूल्य शिक्षण भाग २

मूल्यपाठ क्रमांक १

शिक्षणाची गोडी

फार दिवसाची गोष्ट आहे. आदरणीय प्रेषित (स.) यांनी जगाचा निरोप घेतला होता. सहाबा (र) यांचा काळ सुध्दा संपलेला होता. त्याकाळी मुस्लिमां मध्ये एक मोठे विद्वान होऊन गेले. त्यांचे नाव होते इमाम मालिक (र) ते मदिना येथे कुरआन आणि हदीसचे शिक्षण देत होते. विद्यार्थी लांबून त्यांच्याकडे शिक्षण घेण्यासाठी येत असत.

एके दिवशी ते शिकवत होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पेनहून आलेला एक विद्यार्थी बसलेला होता. त्यांचे नाव यह्या होते. त्यांना धार्मिक शिक्षणाची आवड होती. फार लांबून ते इमाम मालिक यांच्याजवळ धार्मिक शिक्षण घेण्यासाठी आले होते. शिकवणे चालूच होते की हत्ती! हत्ती!! म्हणून आरडाओरड झाली.

अरबदेशात हत्ती नसतात. अरबी लोकांना हत्ती अनोखा होता. आवाज ऐकल्यावर सर्व मुलं बाहेर आली आणि हत्तीला पाहू लागले. परंतु यहया आपल्या जागेवरून उठले नाही. गुरुने त्यांना विचारले, "बेटा यहया! तुमच्या स्पेन देशात सुध्दा हत्ती नाहीत. तुम्ही बाहेर का गेला नाहीत. जा हत्तीला पाहून ये."

"प्रिय गुरुजी! मी आपला देश सोडून आपल्याजवळ शिक्षण घेण्यासाठी आलो आहे. हत्ती पाहण्यासाठी इतक्या लांबून येथे आलेलो नाही." यहयाने अदबीने उत्तर दिले.

गुणी विद्यार्थ्याचे हे बोल ऐकून इमाम मालिक (रह) यांना अति आनंद झाला. त्यांनी याहयाला आशिर्वाद दिला आणि सांगितले, "तुम्ही तर फार समझदार आहात."

गुरुची प्रार्थना अल्लाहने कबूल केली. याहया स्पेन देशाचे एक थोर विचारवंत आणि धर्मपंडित बनले."

प्रश्न : १) इमाम मालिक (रह) याहयाशी खुष का होते?

२) ते हत्ती पाहावयास का गेले नाहीत?

मूल्यपाठ क्रमांक २

कुरआनचा आदर

महमूद नावाचा एक मोठा बादशाह होवून गेला. तो गझनीचा राहणारा होता. त्याने भारतावर अनेक कारणांनी सतरा हल्ले केले होते. त्याच्या जीवनाची एक प्रसिध्द घटना आहे की एका रात्री तो झोपण्याची तयारी करत होता तेव्हा त्याची नजर कुरआनकडे गेली. कुरआन भींतीवर ठेवलेले होते.

आता काय करावे. त्या बाजूने पाय पसरून झोपायचे म्हणजे कुरआनचा अनादर होतो. विचार केला पलंग फिरवून घ्यावा. कुरआनकडे झोपतांना डोके राहिले तर ठीक आहे म्हणून पलंगाची दिशा बदलून घेतली. आता झोपू लागला तर त्याच्या मनात विचार आला की माझ्या खोलीत अल्लाहचा ग्रंथ आहे आणि मी त्यास समजून वाचण्याऐवजी आणि कुरआन नुसार आचरण करण्याऐवजी बेफिकीरीने झोपून जावू, कसे शक्य आहे? हे योग्य नाही, विचार केला की कुरआनला दुसऱ्या खोलीत नेवून ठेवावे आणि नंतर झोपी जावे.

हा विचार मनात येता क्षणीच बादशाहाला थरकाप भरला. विचार केला की हा तर मोठा अनादर आहे. मी माझ्या आरामासाठी अल्लाहचा ग्रंथ आपल्या खोलीतून हलवित आहे.

ह्याच विवंचनेत बादशाहाला झोप काही लागली नाही. रात्रभर जागाच राहीला.

स्वतःच्या हाताने कष्ट करा

मुस्लिमांचे एक खलिफा माननीय उमर बीन अब्दूल अजीज (र) होवून गेले आहेत. ते अत्यंत पुण्यशील आणि सरळ स्वभावी होते.

एक दिवस त्यांच्याकडे एक पाहुणा आला. ते दिव्याच्या प्रकाशात काही लिहित होते. दिव्यातील तेल संपून दिवा विझून गेला. पाहुण्यांनी सांगितले,

"आपण काळजी करू नका, मी दिवा दुरुस्त करून देतो."

"पाहुण्यांना कामाला लावणे ठीक नाही." खलिफाने उत्तर दिले.

"बरे, तर नोकराला उठवतो तो दिवा ठीक करून देईल." पाहुण्याने सल्ला दिला.

"नाही, त्या बिचाऱ्याला झोपू द्या. आताच तर झोपला आहे. त्याला विनाकारण त्रास होईल" असे सांगून खलिफा जागेवरून उठले आणि तेल घालून दिवा स्वत: घेवून आले.

"शेवटी तुम्हीच त्रास घेतला." पाहुणा बोलला

"काय झाले यात त्रास कसला? जेव्हा मी तेल टाकण्यासाठी गेलो तेव्हा सुध्दा उमर होतो आता परत आलो तरी उमरच आहे." खलिफांनी उत्तर दिले.

पाहुण्याने खलिफाचे हे उत्तर ऐकल्यावर स्वत:च निरुत्तर झाला.

प्रश्न : १) उमरबीन अब्दूल अजीज कोण होते ?

२) पाहुण्यांशी त्यांचे काय बोलणे झाले?

३) त्यांनी पाहुण्याला त्रास का दिला नाही?

४) नोकराला झोपेतून उठविण्यास का मनाई केली ?

५) तुम्ही तुमचे कोण कोणते काम स्वत: करता?

मूल्यपाठ क्रमांक ४

शौर्य

आदरणीय प्रेषित (स.) यांच्या काळातील गोष्ट आहे. ते हिजरत (परदेश गमन) करून मदिना येथे स्थायिक झाले. परंतु शत्रु तिथे सुध्दा त्यांना सुखानं राहू देत नव्हते. एके वर्षी शत्रुने मोठा फौज फाटा तयार करून मुस्लिमांवर हल्ला केला. तिकडे मुस्लिमांनी सुध्दा युध्दाची तयारी सुरु केली होती. स्त्री पुरुष आणि मुलं सुध्दा धर्मासाठी सर्वस्व अर्पण करण्यासाठी तयार झाले होते. प्रत्येकजण पुढे येऊन स्वत:ला ह्या कामी हजर करू लागला. परंतु प्रेषित (स.) यांनी मुलांना ह्या कामासाठी परवानगी दिली नाही. मुलांना त्यांनी सांगितले "आता तुम्ही लहान आहात जेव्हा मोठे व्हाल तेव्हा लढण्यासाठी (जिहाद) या".

मुलांपैकी एका मुलाचे नाव राफेअ होते. त्याला प्रेषित (स.) यांनी घरी परत जाण्यासाठी सांगितले आणि त्याला म्हणाले की "बाळा! तुझी उंची सुध्दा अद्याप कमीच आहे."

त्या लहानग्या राफेअला जिहादमध्ये भाग घेण्याची फार उत्सुकता होती. तो फार हुशार होता. त्याला एक युक्ती सुचली. आदरणीय प्रेषित (स.) यांच्यासमोर पंज्यावर उभा राहिला आणि म्हणू लागला,'हे अल्लाहचे प्रेषित (स.) मी तर मोठा आहे मी माझ्या तलवारीने शत्रूंचा नायनाट करीन."

आदरणीय प्रेषित (स.) यांनी त्या मुलाची उत्कंठापाहून त्याला लष्करात भरती केली. तेव्हढ्यात समुरा नावाचा मुलगा पुढे येऊन म्हणू लागला.

'हे अल्लाहचे प्रेषित (स.) ! मला सुध्दा लष्करात भर्ती करून घ्या. लढाई ताकदीने होते आणि मी तर राफेअ पेक्षा जास्त ताकदवान आहे. उंची लहान आहे म्हणून काय झाले ? राफेअ बरोबर कुस्ती लावून पहावे."

आदरणीय प्रेषित (स.) यांनी समुराचे म्हणणे ऐकले दोघात कुस्ती झाली. समुराने राफेअवर कुस्तीत मात केली. आता समुरा सुध्दा इस्लामी लष्करात सामील झाला.

अल्लाह ह्या शूरलोकांशी प्रसन्न होवो ! (आमीन)

प्रश्न : १) जिहाद ची व्याख्या करा?

२) तुम्ही शौर्याचे काम केले असेल तर वर्णन करा?

मूल्यपाठ क्रमांक ५

सत्याचा परिणाम

सुलतान बायजीद नावाचा तुर्की लोकांचा एक मोठा बादशाह होता. तो फार शूर आणि न्यायी होता. नमाज आणि रोजे नियमित अदा करत असे. परंतु नमाज मात्र सामुदायिकरित्या अदा करत नव्हता. त्याच्या काळातील ही घटना आहे.

एकदा न्यायालयात न्यायाधिशा समोर एक खटला उभा राहिला. एका पक्षकाराकडून सुलतान स्वत: साक्षीदार म्हणून होता. न्यायाधीश मौलाना शमशुद्दीन होते. ते रशियाचे निवासी होते. ते शरियतचे पक्के अनुयायी होते.

सुलतान साक्षीसाठी कोर्टासमोर हजर झाला. न्यायाधिसाने सुलतानची साक्ष स्वीकारण्यास मनाई केली. सुलतान स्वत: न्यायनिष्ठ होता आणि न्यायाधिश न्यायनिष्ठा काय असते हे पूर्ण जाणून होते. सुलतान नाराज झाला नाही. मात्र मनाई हुकुमाचे कारण त्याने विचारले. न्यायधिशांनी सांगितले,

"शरियत नुसार त्या लोकांची साक्ष कबूल होत नाही जे नमाज सामुदायिकरित्या (जमातसह) अदा करीत नाहीत. आता आपण स्वत: समजून घ्यावे की आपली साक्ष का रद्द केली गेली.

सुलतानवर ह्या सत्यत्तेचा परिणाम मोठा झाला. ह्या नंतर सुलतान नमाज जमातसह अदा करण्याची प्रयत्नपूर्वक मेहनत घेऊ लागला.

प्रश्न : १) सुलतान बायजीद कोण होता ?

२) इस्लामी न्यायालयाने त्याची साक्ष का मान्य केली नाही?

३) न्यायधिश आणि सुलतान मध्ये काय संवाद घडला?

४) सुलतानवर न्यायाधिशाच्या म्हणण्याचा काय परिणाम झाला?

५) न्यायाधिशाची कोणते गुण तुम्हाला अधिक आवडले?

मूल्यपाठ क्रमांक ६

साधी राहणी

सुलतान नसिरुद्दीन नामक बादशाह हिंदुस्थानात होवून गेला. तो अत्यंत पुण्यशील आणि साधी राहाणी असणारा बादशाह होता. म्हणायला तर तो बादशाह होता परंतु इतर बादशाहापेक्षा त्याचे राहाणीमान अत्यंत साधे होते. तो आपल्या खाजगी खर्चासाठी सरकारी तिजोरीतून एक पैसा सुध्दा घेत नसे. सहा महिण्यात एक कुरआन ग्रंथ आपल्या हाताने लीपिबध्द करत असे. अशा प्रकारे वर्षातून दोन ग्रंथ तयार होत असत. त्यांच्या हदियामूल्य रकमेतून आपला खर्च भागवित असत. कधी कधी तो राजा टोप्या विणून विकत असे. अशा तुटपुंज्या पैशात त्या राजाला अत्यंत साधे राहाणीमान स्वीकारावे लागत असे.

सुलतानची एकच महाराणी होती. ती सुध्दा नेक आणि साधे राहाणीमान असणारी स्त्री होती. सुलतान आपल्या मेहनतीने कमवित होता. राणी सुध्दा हाताने स्वयंपाक करीत आणि अशा प्रकारे पतिपत्नी साधे जीवन जगत होते.

एके दिवशी राणी स्वयंपाक करत होती. तव्यावरून भाकरी खाली उतरवत असतांना तिचा हाथ भाजला. फार त्रास होवू लागला. सुलतानला ती सांगू लागली.

"तुम्ही माझ्या मदतीसाठी एक नोकरानी ठेवली असती तर फार मेहरबानी झाली असती."

यावर सुलतान म्हणाला,

"बीवी! तुला तर माहित आहे की आपली मिळकत फार तोकडी आहे. त्यातून नोकरानी ठेवणे अशक्य आहे. सरकारी खजाना तर जनतेचा आहे. जनतेच्या कल्याणासाठीच तो खर्च होतो. त्यातून आपल्यासाठी खर्च आपण करू शकत नाही. नोकरानी कशी ठेवता येईल?

राणीसाहेब उत्तर ऐकून गप्प बसल्या नंतर त्यांनी कधीच नोकरानीचा विषय काढला नाही.

प्रश्न : १) सुलतान ने राणीसाहेबांची मागणी मान्य का केली नाही ?

२) इस्लामी शासनात सरकारी खजाना कोणासाठी असतो?

मूल्यपाठ क्रमांक ७

पशु दया

फार फार दिवसांची गोष्ट आहे. गझणी शहरात एक माणूस राहत होता त्याचे नाव होते सुबुकतगीन ! तो आपल्या कबिल्याचा सरदार होता. मात्र तो अत्यंत गरीब होता. एक घोडा सोडून त्याच्याजवळ काहीच नव्हते. तो आपला बराच वेळ प्रवासात आणि शिकार करण्यात घालवित असे.

एके दिवशी तो शिकारीला निघाला. रस्त्यात एक हरण आणि तिचे पारडे चरतांना त्याने पाहिले. त्याने घोड्याला त्यांच्या मागे जोराने पळविले. दोघेही जीव वाचविण्यासाठी पळत सुटले. परंतु हरणीचे बाळ शेवटी बाळच होते! किती पळणार ! शेवटी सुबुकतगीनने त्याला पकडले आणि त्या हरणीच्या बाळाला घेवून घराकडे चालू लागला.

हरण बिचारी ममतेने व्याकूळ झाली आणि आपल्या बाळासाठी त्याच्या मागे मागे चालू लागली. सुबुकतगीनची नजर हरणावर गेली. हरणाचा दु:खी चेहरा आणि कावरेबावरे डोळे सुबुकतगीनने पाहिल्यानंतर त्याला दया आली आणि हरणाच्या बाळाला सोडून दिले. बाळ पळत पळत व उड्या मारत आईजवळ गेला आणि दोघांनी खुशीखुशीने जंगलाची वाट धरली.

रात्री सुबुकतगीन याने स्वप्नात प्रेषित (स.) यांचे दर्शन घेतले. प्रेषित (स.) यांनी सांगितले,

''सुबुकतगीन! तू हरणावर दया केली. तुमचे हे कार्य अल्लाहला पसंत पडले. तुमचे नाव बादशहांच्या यादीत लिहिले गेले. आता लवकरच तुम्ही बादशाह होणार. परंतु शासनाधिकार प्राप्त झाल्यानंतर गर्विष्ठ बनू नकोस! आपल्या प्रजेबरोबर असाच दयाशील व्यवहार ठेव.''

यानंतर सुबुकतगीन लवकरच बादशाह झाला. त्याने जीवनभर स्मरणात ठेवले की प्रजेशी प्रेमळ आणि दयेचा व्यवहारच केला जावा.

प्रश्न : १) सुबुकतगीन ने हरणाच्या बाळाला का सोडले ?

२) सुबुकतगीनला बादशाह का बनविले गेले ?

३) मुस्लिम बादशाहला आपल्या प्रजेशी कसा व्यवहार केला पाहिजे?

४) तुम्ही पशुंशी प्रेमाचा आणि दयेचा व्यवहार कधी केला ? वर्णन करा?

मूल्यपाठ क्रमांक ८

वचनपूर्ती

आदरणीय प्रेषित (स.) तरूण होते. त्यांना अद्याप प्रेषितत्व बहाल झाले नव्हते. ते व्यापार धंदा करत होते. माननीय अब्दुल्लाह त्यांना धंद्यात मदत करत दोघे मिळून व्यापार धंदा करीत होते.

एके दिवशी त्यांनी मालाची विक्री करण्याचे ठरवले. काही निश्चित झाले होते आणि काही सौदा करणे शिल्लक होता की अब्दुल्लाह काही कामासाठी दूर गेले. जातांना त्यांनी सांगितले की मी परत आल्यानंतर राहिलेला सौदा पूर्ण करीन.

नंतर अब्दुल्लाह विसरून गेले. तीन दिवस लोटले तरी त्यांनी दिलेले वचन त्यांच्या लक्षात राहिले नाही. तिसऱ्या दिवशी जेव्हा त्यांना आठवण आली तेव्हा त्वरित ते धावतच त्या जागी पोहचले, जेथे दोघांमध्ये तीन दिवसांपूर्वी बोलणे झालेले होते, तेथे पोहचल्यावर काय पाहतात की प्रेषित (स.) त्याच जागी थांबून वाट बघत होते.

अब्दुल्लाह आपल्या ह्या कृत्यावर फार दिलगीर झाले, परंतु प्रेषित (स.) यांना ह्या एकाच जागी तीन दिवस थांबून राहण्याचे काही वाटले नाही. त्यांनी म्हटले की,

"अब्दुल्लाह! तू मला फार त्रास दिला तीन दिवसांपासून मी येथेच बसून तुझी वाट पहात आहे."

प्रश्न : १) आमचे प्रेषित (स.) तरूण वयात काय करत?

२) तीन दिवसांपासून ते एकाच जागी का थांबले होते?

३) तुम्ही दिलेले वचन किती पाळता?

४) ह्या कथेपासून तुम्ही काय बोध घेतला ?

मूल्यपाठ क्रमांक ९

गुरुंचा आदर

हारून रशिद मुस्लिमांचे एक महान राजे होवून गेले. त्यांच्या मुलाचे नाव मामून होते. मामूनचे बालपण मोठ्या लाडात गेले होते. राजपूत्र एकीकडे आणि दुसरीकडे अति लाड, त्यामुळे मामून खोडकर बनला. राजदरबारातील नोकर वर्ग त्यांच्या त्रासाला कंटाळला होता. मोठमोठ्यांना तो चोप देत असे. सर्वजण मुकाट्याने त्याच्या हाणामारीला आणि त्रासाला सहन करत होते. त्यामुळे मामून आणखी बिघडून गेला. तो कोणाची ही पर्वा करत नसे. तो कुणालाही भीत नसे. सदासर्वदा तो तोडफोड करीत असे.

मामून जेव्हा मोठा झाला त्यांच्या शिक्षणासाठी एक शिक्षक नेमला गेला. शिक्षक राजदरबारात आले. मामूनला बोलाविले. तो खेळात मग्न होता. शिक्षकाने बोलाविल्यानंतर सुध्दा तो आला नाही. नोकरांकरवी बोलावणे पाठविले परंतु तो आला नाही. नोकरांनी गुरुजी जवळ तक्रार केली की तो कुणाचे ही ऐकत नाही आणि आम्हा सर्वांना मारपीट करतो. काय करणार मुकाट्याने आम्ही सहन करतो. गुरुने मामूनचा दोष ओळखला आणि त्याला बाहेर बोलावले. जेव्हा तो बाहेर आला तेव्हा त्याला चांगलाच मार दिला. मामून रडू लागला. आजपर्यंत त्याने कुणाचाही मार खाल्ला नव्हता. परंतु गुरुंच्या आदरापोटी त्याने ब्र सुध्दा काढला नाही. डोळ्यातील अश्रू पुसले आणि गप्प बसला.

तेव्हढ्यात तेथून सरदाराचे जाणे झाले. मामून अदबीने एके ठिकाणी बसून वाचत होता. सरदार गेल्यानंतर गुरुजी म्हणाले,

"मामून, सरदारजवळ तू तक्रार का केली नाही?"

यावर मामून अदबीन म्हणाला.

"आदरणीय गुरुजी! तुम्ही माझ्या भल्यासाठी मला मारले. मी कोणाकडे का म्हणून तक्रार करावी ? सरदार तर सरदार आहे. ते माझे पिता व बादशाह आहेत. ते येथे आले असते आणि मला विचारले असते तेव्हा सुध्दा मी तक्रार केली नसती."

प्रश्न : १) मामूनने गुरुचा मार का खाल्ला ?

२) तुमच्याशी जर असा व्यवहार केला तर तुम्ही काय कराल ?

मूल्यपाठ क्रमांक १०

अनाथांची काळजी

तुम्ही हातीमताईचे नाव तर ऐकले असेल. दान धर्म करण्यात ते प्रसिध्द होते. त्यांच्या घराण्यात एक मोठे संत होवून गेले. त्यांचे नाव दावूदताई होते.

फार दिवसापासून दावूदताई यांना मटन खायला मिळाले नव्हते. एके दिवशी मटन खाण्याची इच्छा झाली. त्यांनी मटन घरी आणले. चवदार स्वयंपाक करण्यात आला. दावूदताई जेव्हा भोजनासाठी बसले तेव्हा त्यानी वस्तीतील अनाथ मुलांचे नाव घेवून विचारले,

"ह्या मुलांची काय स्थिती आहे?"

"सध्याही बिचारी मुले हालअपेष्टा सहन करत आहेत. त्यांचे गरीबीचे दिवस कधी पालटणार पाहु या." दासीने उत्तर दिले.

" त्या बिचाऱ्या मुलांना मटन खावयास कधीच मिळत नसेल. हे मटन घेवून जा आणि त्या अनाथ मुलांना खावू घाला." दावूद ताई म्हणाले.

"महाशय, आपण सुध्दा बऱ्याच दिवसानंतर मटन खात आहात. आता तुम्ही खावून घ्या. एखाद्या वेळी त्या मुलांना मटन खावू घालू या." दासीने उत्तर दिले.

"नाही ! मी खाणार नाही" दावूदताईने उत्तर दिले. "तुम्ही त्यांना खावू घाला. त्यांचे खाणे अल्लाहजवळ पोहोचेल आणि माझे खाणे माती बनेल."

असे सांगून त्यांनी मटनाचा स्वयंपाक अनाथ मुलांसाठी पाठवून दिला आणि इच्छा झाली होती तरी स्वत: मटनाचे जेवण केले नाही.

प्रश्न : १) हातीम ताई कोण होते ?

२) दावूदताई विषयी तुम्ही काय जाणता ?

३) काय तुमच्या वस्तीमध्ये कोणी अनाथ आहेत ? तुम्ही त्यांच्याशी कसा व्यवहार करता?

मूल्यपाठ क्रमांक ११

गरीबांना जेवू घालणे

माननीय उमर (र) यांचे सुपुत्र अब्दुल्लाह गरीब लोकांची फार काळजी घेत असत. गरीबाला बरोबर घेतल्याशिवाय जेवण कधीही घेत नसत.

एकदा माशे खाण्याची इच्छा त्यांना झाली. माशे आणले गेले. त्यांच्या सुविद्य पत्नी सफिया यांनी माशांचे चवदार जेवण तयार केले. ते जेवायला बसून सुरवात करणारच तर घराबाहेरून एका फकीराचा आर्त स्वर ऐकू आला. त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले की हे जेवण त्या फकीराला देवून टाका.

एकदा लोकांनी त्यांच्या पत्नीजवळ तक्रार केली की त्या आपल्या पतिची व्यवस्थित काळजी घेत नाहीत. त्या म्हणाल्या, "काय करू त्यांच्यासाठी मी मोठ्या मेहनतीने स्वयंपाक तयार करते परंतु तो स्वयंपाक ते एखाद्या गरीबाला खाऊ घालतात.

पतीला पोट भरून जेवण घालण्यासाठी पत्नीला एक युक्ती सुचली. जे फकीर आणि गरीब लोक त्यांच्या येण्या जाण्याच्या मार्गावर बसलेले असत त्यांना सांगितले गेले की तिथे बसू नये, आणि बोलावले तरी दारावर येत जाऊ नये.

एकदा ते मशिदीतून नमाज अदा करून बाहेर पडले तेव्हा रस्त्यात त्यांना एकही फकीर तिथे दिसला नाही. त्या सर्वांना त्यांनी बोलावून घेतले परंतु कुणीही आले नाही. गरीबांना बरोबर घेतल्याशिवाय अब्दुल्लाह (र) कधीही जेवण घेत नसत. त्यामुळे त्या रात्री त्यांनी सुध्दा जेवण घेतले नाही आणि उपासी झोपले.

प्रश्न : १) माननीय अब्दुल्लाह (र) कोण होते?

२) त्यांची सुविद्य पत्नी स्वयंपाक चांगला का करीत होती?

३) त्यांच्या पत्नीने गरीबांना का मनाई केली?

४) अब्दुल्लाह (र) यांनी जेवण का केले नाही?

५) तुम्ही ह्या कथेपासून काय बोध घेतला?

मूल्यपाठक्रमांक १२

याचना करू नका

आदरणीय प्रेषित (स) अल्लाहचे प्रिय दास होते. मानवांना सरळ मार्ग दाखविण्यासाठी त्यांना पाठविले गेले. मानव कल्याणासाठी प्रेषित (स.) यांनी अतिकष्ठ झेलले. काहीही न घेता मानवतेवर अपार उपकार केले. तरी नादान लोकांनी त्यांच्यापासून फायदा उठविण्याऐवजी त्यांना त्रास देत राहिले. त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. घराबाहेर काढून त्यांना देश सोडण्यास भाग पाडले. येवढेच करून थांबले नाही तर परदेश गमनानंतर सुध्दा तिथे त्यांना त्रास देवू लागले.

एकदा ह्या नादानलोकांनी मोठे लष्कर उभारले आणि मदिना शहरावर हल्ला केला. आदरणीय प्रेषित (स) आणि त्यांच्या सहाबी (साथी) लोकांनी हिमतीने तोंड दिले. लहान लहान मुलं सुध्दा अल्लाहच्या साठी समर्पण करण्यास तयार झाली. काहींना प्रेषित (स.) यांनी जिहाद (धर्मयुध्द) मध्ये भाग घेण्यास परवानगी दिली परंतु काहींना लहान वयाचे असल्यामुळे परवानगी दिली नाही. अशा लहान मुलांपैकी एक अबू सईद (र) होते. त्यांच्या वडीलांनी शिफारीस केली की, "महाशय, आपण त्याच्या कमी वयाचा विचार करू नका तो शक्तीशाली आहे. त्याला लष्करात भरती करून घ्या."

परंतु प्रेषित (स.) यांनी नकार दिला. त्या मुलाला फार वाईट वाटले. युध्द झाले. अल्लाहच्या कृपेने मुस्लिम विजयी झाले परंतु मोठमोठे सहाबी (साथी) शहीद झाले. जीवहानी मोठ्या प्रमाणात झाली. अबू सईद (र.) यांचे वडील सुध्दा ह्या युध्दात शहीद झाले होते.

सहाबा (र) यांच्या कडे संपत्ती अशी मुळात नव्हतीच परंतु जी काही थोडी फार होती ती सर्व अल्लाहच्या मार्गात खर्च झाली होती. अबू सईद (र) यांच्या घरी सुध्दा काहीच नव्हते. एक तर लहान वय, घरात खावयास काहीच नाही आणि घरात कोणी कमावता नाही. मोठ्या संकटात सापडले. अल्लाह आणि प्रेषित (स.) यांच्या शिवाय त्यांना मदद करणारा कोण होता?

म्हणून प्रेषित (स) यांच्या सेवेत हजर झाले. इच्छा होत होती की घराची हाल अपेष्टा त्यांच्यापुढे वर्णन करून काही मदद मागावी. त्यांचा चेहरा पाहताक्षणी प्रेषित (स.) म्हणाले,

"जो कोणी संयम बाळगतो, अल्लाह त्याला संयमी बनवतो. जो कोणी पवित्र होऊ इच्छितो, अल्लाह त्याला पवित्र बनवितो आणि जो कोणी खुशाली इच्छितो अल्लाह त्याला खुशाल बनवितो."

आदरणीय प्रेषिंत (स) यांच्या तोंडून वरील वाक्य ऐकताच अबू सईद (र) यांचा विचार बदलून गेला. प्रेषित (स.) यांच्या जवळ काही न मागता परत फिरले.

अल्लाह त्यांच्या ह्या कृत्यामुळे खुष झाला. त्यांना अल्प वयात प्रगाढ ज्ञानी बनविले. त्यांच्या सारखे प्रगाढ ज्ञानी (आलीम) फारच थोडे आहेत.

प्रश्न : १) अबू सईद (र) जिहादसाठी का निवडले गेले नाहीत?

२) वडीलांनी मुलाची शिफारस का केली?

३) अबू सईद (र) प्रेषित (स.) यांच्याजवळ कशासाठी गेले होते?

४) प्रेषित (स.) यांच्या सांगण्याचा त्यांच्यावर काय परिणाम झाला?

५) अल्लाहने त्याचा काय मोबदला त्यांना दिला?

मूल्यपाठ क्रमांक १३

न्यायनिष्ठा

फार दिवसाची गोष्ट आहे. एक मुस्लिम बादशाह दिल्लीवर राज्य करत होता. त्याचे नाव मुहम्मद तुघलक होते. तो फार समजुतदार, द्रष्टा आणि न्ययनिष्ठ होता. एकदा तो गस्तीवर होता. रस्त्यात दोन मुलं आपसात भांडताना त्यने पाहिले. एक श्रीमंताचा तर दुसरा गरीबाचा मुलगा होता. श्रीमंताचा मुलगा भांडत होता आणि गरीबाचा मुलगा तिथे गुपचुप उभा होता.

बादशाहला वाटले की श्रीमंताच्या मुलाने गरीबाच्या मुलाला मारले असेल म्हणून त्या मुलाला छडीचा मार दिला. परंतु गुन्हा गरीबाच्या मुलाने प्रथम केला होता. श्रीमंताच्या मुलाने त्याला मारले नव्हते. गरीबाचा मुलगा अशासाठी रडत होता की आपल्याला आता मार बसणार!

मुहम्मद तुघलकच्या राज्यात जनतेला राजाविरुध्द खटला भरण्याचा अधिकार होता. श्रीमंत मुलाने बादशाह विरुध्द खटला भरला. बादशाह गुन्हेगार ठरला. न्यायाधिशाने न्याय दिला की बादशाह गुन्हेगार आहे आणि त्याला शिक्षा भोगण्यास तयार झाले पाहिजे.

बादशाह शिक्षा भोगण्यास तयार झाला आणि मुलाला दरबारमध्ये बोलावून तीच छडी त्याच्या हातात दिली. त्या मुलाला आदेश दिला की त्याने बादशाहशी बदला घ्यावा.

मुलगा प्रथम घाबरला परंतु बादशाहने जेव्हा शपथ घातली तेव्हा तो तयार झाला. भरल्या दरबारात त्या मुलाने बादशाहला एकवीस वेळा छडीने मार दिला. एकदा तर मारता मारता बादशाहचे मुकूट खाली पडले. बादशाहने शिक्षा आनंदाने सहन केली.

सर्व दरबारी लोक बादशाहाच्या न्यायनिष्ठेला पाहून दंग राहिले.

प्रश्न : १) मुहम्मद तुघलक कोण होता?
२) मुलाने त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल का केला?
३) बादशाहाने शिक्षा का भोगली?
४) न्यायनिष्ठा काय आहे? बादशाहने ती कशी साबित करून दाखविली?

संयम

माननीय सईद (र) एक सहाबी (प्रेषितांचे सोबती) होते एकदा एका स्त्रीने त्यांच्यावर एका घरासाठी दावा दाखल केला. घर त्यांचे होते. स्त्रीचा दावा खोटा होता. त्यांनी त्या स्त्रीला रोखले नाही आणि घर त्या स्त्रीच्या ताब्यात दिले परंतु इतके सांगितले,

"हे अल्लाह ! जर ही स्त्री खोटी आहे तर तिला आंधळी बनवून टाक आणि ह्याच घरात तिची कबर बनवून टाक."

अल्लाहने त्यांचा शाप स्वीकारला. त्या स्त्रीने जबरदस्तीने घरावर कब्जा केलाच होता. काही दिवसानंतर ती आंधळी झाली. भिंतीला धरून चालत होती आणि सांगत जात की मला सईदचा शाप लागला आहे.

एके दिवशी ती उठली डोळ्याने दिसत नव्हते. चाचपडत चालत होते. त्या घरात एक विहीर होती. ती त्याच विहीरीत पडली आणि शेवटी तिच विहीर तिची कबर बनून गेली.

प्रश्न : १) संयमाचे फळ कसे असते?

मुल्यपाठ क्रमांक १५

ईमानदारी

माननीय उमर बिन अब्दुल अजीज (र) एक महान खलिफा होवून गेले. ते सरकारी खजिन्याला प्रजेचे धन समजत होते आणि त्याचे रक्षण करीत होते. एकदा सरकारी खजिन्यात फार सफरचंद जमा झाले. ते नेहमी प्रमाणे प्रजेला वाटत होते. तेव्हढ्यात त्यांचा लहान मुलगा तिथे आला. तो अज्ञानी होता त्याला काहीच कळत नव्हते की हे सफरचंद कुणाचे आहेत. आपल्या वडीलांना वाटतांना त्याने पाहिले तर समजून बसला की आपले असतील. एक सफरचंद हातात खाण्यासाठी घेतले.

सफरचंद तर सरकारी होते आणि सरकारी वस्तूंवर सर्वांचा अधिकार असतो. खलिफाने पाहिले आणि त्याच्या हातातून ते सफरचंद परत घेतले. जनतेच्या खजिन्यात ही अफरातफर झाली असती. मुल रडायला लागले. त्यांनी मुलाचे सांत्वन केले परंतु ते रडत रडत घरात गेले आणि आपल्या आईला सगळे सांगितले. आईने मुलाचे अश्रू पुसले आणि बाजारातून सफरचंद आणून त्याला दिले.

खलीफा आत आल्यावर त्यांना सफरचंदाचा स्वाद आला. पत्नीशी विचारले की, "घरात सरकारी सफरचंद तर आला नाही ना?"

"सरकारी सफरचंद तर नाही परंतु मी बाजारातून सफरचंद विकत आणून बाळाला दिले. तुम्ही त्याच्या हातातील सफरचंद हिसकावून घेतले. त्यामुळे तो रडत होता. काही केल्या ऐकेना म्हणून मी बाजारातून विकत मागविले आणि त्याला दिले. तेव्हा तो चुप बसला." पत्नीने सांगितले.

ह्यावर खलीफाने उत्तर दिले, "काय करू सफरचंद सरकारी होते. मी बाळाजवळून ते सफरंचद ह्यासाठी हिसकावून घेतले होते की एका सफरचंदासाठी अल्लाहजवळ बेईमान मी सिध्द होवू नये."

खलीफांच्या ह्या सांगण्या वरून पत्नी स्तब्ध झाली.

प्रश्नः १) माननीय उमर बिन अब्दुल अजीज कोण होते?

२) ते सफरचंद का वाटत होते?

३) त्यांनी आपल्या बाळाच्या हातातून सफरचंद का हिसकावून घेतले?

४) अमानत कशाला म्हणतात?

मूल्यपाठक्रमांक १

आदर्श वर्तन

हिंदुस्थानातील बादशाहांपैकी एकाचे नाव नासिरुद्दीन होते. तो अत्यंत दयाळु आणि सदाचारी होता. सरकारी खजान्यातून स्वखर्चासाठी एक पैसा सुध्दातो घेत नसे. जीवनासाठी त्याने साधी राहणी पसंत केलेली होती. पवित्र कुरआन आणि इतर धार्मिक पुस्तकें हाताने लिहून त्यांच्या विक्रीतून आपला खर्च भागवित असे.

एके दिवशी एक श्रीमंत व्यक्ती त्यांच्याशी भेटावयास आला. त्यांनी स्वहस्ते लिहीलेला पवित्र कुरआन त्यांना दाखविला. श्रीमंत व्यक्तीने त्यास पाहिले आणि अत्यानंदित झाला. निरक्षून पाहू लागला आणि म्हणाला, यात काही चुका आहेत, त्यांना दुरुस्त करून घ्या."

श्रीमंत व्यक्तीने दाखवून दिलेल्या चुका काही चुका नव्हत्याच मुळी ! तरी नासिरुद्दीनने वाईट वाटून घेतले नाही. तर स्मित हास्य करीत त्याचे आभार मानले. त्या व्यक्तीने ज्या चुकांकडे लक्ष वेधले होते त्यांना नंतर दुरुस्त करण्यासाठी अधोरेखित केल्या.

त्यावेळी जे लोक उपस्थित होते ते सर्व बादशाहाचे हे वर्तन पाहून दंग झाले. श्रीमंत व्यक्ती तेथून गेल्या नंतर बादशाहाने अधोरेखित केलेले मिटवून टाकले. लोकांनी विचारल्यानंतर बादशाह म्हणाला,

"मला माहित होते की काहीच चुक नाही परंतु मी माझ्या पाहुण्याचा अपमान करू इच्छित नाही, किंवा त्याला नाराज करू इच्छित नाही. त्याचमुळे

मी त्याने दाखविलेली चूक मान्य केली आणि त्यांना अधोरेखित केले होते. आता त्या खुणा मी मिटवून टाकल्या आहेत.

बादशाहाच्या ह्या आदर्श वर्तनामुळे दरबारी लोकांवर प्रभाव पडला. त्यांना आश्चर्य वाटले की इतक्या मोठ्या बादशाहाने मामूली श्रीमंत व्यक्तीला नाराज न करण्यासाठी असे वर्तन केले.

प्रश्न : १) नासिरुद्दीन कसा बादशाह होता? त्यात कोणते वैशिष्ट्य होते?

२) चुक नसतांना सुध्दा त्यांना बादशाहाने का अधोरेखित केले?

मूल्यपाठ क्रमांक २

साधी राहाणी

माननीय सलमान (र) एक महान सहाबी होऊन गेलेत. ते ईराणचे रहिवाशी होते. त्यांचे वडील त्यांच्याशी फार प्रेम करत असत. मुलीं प्रमाणे त्याना घराबाहेर जाऊ देत नसत. लहानपणा पासूनच धर्म सेवेची त्यांना आवड होती. सुरवातीस ते अग्नी पुजक होते. एकदा संपत्तीच्या देखरेखीसाठी त्यांच्या वडीलांनी त्यांना गावी पाठविले. रस्त्यात एक चर्च त्यांनी पाहिला. त्यावेळी त्यात नमाज अदा केली जात होती. त्यामुळे ते प्रभावित झाले ते सत्यधर्मशोध कार्यात मग्न झाले. एका टोळीसह इजिप्त मध्ये गेले. ख्रिस्ती पादरी लोकांसह राहू लागले. परंतु तिथे त्यांना शांती लाभली नाही. ते पादरींच्या मुखाद्वारे अंतिम प्रेषित येण्याची वार्ता अनेकदा ऐकत होते. त्यांना त्याच प्रेषितांची प्रतिक्षा होती.

एकदा एका अरबी टोळी बरोबर भेट घडली. त्यांनी आपल्या शेळी मेढंया ज्या पाळून ठेवल्या होंत्या, सर्व अरबी टोळीस देवून टाकल्या आणि सांगितले, "ह्याच्या मोबदल्यात तुम्ही मला तुमच्या गावी घेवून चला." त्या लोकांनी त्यांना आपल्या बरोबर घेतले परंतु नंतर धोक्याने त्यांना गुलाम बनविले आणि एका यहुदीला विकून टाकले. आता ते परावलंबी बनले. प्रेषित (स.) यांच्या सेवेत हजर होऊ शकले नाहीत. प्रेषित (स.) देश त्याग करून मदिना येथे आले. सलमानला सुध्दा एका व्यक्तीने खरीदी करून मदिन्यात आणले होते. तेथे प्रेषित (स.) सेवेत दाखल झाले. आणि इस्लाम मध्ये दाखल झाले. प्रेषित (स.) यांनी त्यांना गुलामीतून स्वतंत्र केले.

माननीय उमर (र) यांच्या कारकिर्दीत ते मदाईनचे गव्हर्नर बनले. पाच हजार दिनार प्रतिमाह वेतन त्यांना मिळू लागले. परंतु जेंव्हा सरकारी खजिन्यातून पैसा मिळे तेव्हा तो पैसा गरीब आणि असहाय लोकात वाटून टाकीत असत. स्वतःच्या हाताने चटाई विणून ते रोजी (उपजीविका) कमवित असत. त्यांनी स्वतः साठी घर बनविले नाही. झाडाच्या आणि भिंतीच्या आसऱ्याला पडून असत. एक फूलपात्र आणि एक तांब्या हाच राज्यपालांचा संसार होता. जेव्हा मृत्यू घटका जवळ येऊन ठेपली तर ह्या वस्तूंकडे पाहून रडत असे. त्यांना ह्या दोन वस्तू सुध्दा ओझे वाटत होते.

प्रश्न : १) सल्मान (र) कोन होते? ते मदिना येथे कसे पोहचले होते?

२) त्यांनी इस्लाम प्रवेश कशा प्रकारे केला?

३) राज्यपालपद मिळाल्यानंतर त्यांची वागणुक कशी होती?

मूल्यपाठ क्रमांक ३

धाडस

माननीय उस्मान (र) यांच्या कारकिर्दीतील घटना आहे. रोमनशी एकदा युध्द झाले. मुस्लिमांद्वारे इजिप्तच्या राज्यपालांना लष्कराचे प्रमुख बनविले गेले. ते वीस हजार लष्कर घेवून रवाना झाले. रोमन फौज अंदाजे दोन लाख होती. घमासान युध्द झाले. लढाईच्या दरम्यान रोमन फौजेच्या कमांडरने घोषणा केली की मुस्लिम फौजेच्या कमांडरला जो ठार करील त्याला मी माझी मुलगी देईन आणि एक लाख दीनार बक्षीस देईन.

मुस्लिमांनी जेव्हा ही घोषणा ऐकली तेव्हा काही लोक घाबरून गेले. माननीय अब्दुल्लाह बिन जुबैर (र) त्यावेळी हजर होते. त्यांचे वय काही जास्त नव्हते. परंतु ते महान शूर आणि धाडसी होते. त्यांना माहित पडल्यानंतर ते म्हणाले, "घाबरण्याचे काही कारण नाही. आमच्याकडून सुध्दा घोषणा केली जावी की जो लढवय्या मुस्लिम रोमन कमांडरची हत्या करील त्याचे लग्न त्याच्या मुलीशीलावले जाईल. एक लाख दीनार बक्षीसा पेक्षा जास्त त्याला त्या शहरांचा सरदार बनविला जाईल जे आज रोमन कमांडरच्या ताब्यात आहेत.

फार वेळेपर्यंत लढाई चालत राहीली. लढाईच्या दरम्यान अब्दुल्लाह (र) यांची नजर रूमी कमांडरवर पडली. तो आपल्या फौजेच्या मागे होता आणि दोन दासी त्याच्या सेवेत होत्या. जेव्हा त्यांनी ही स्थिती पाहिली तेव्हा त्याच्या डरपोकपणाचा अंदाज त्यांना आला. त्याला गाफिल पाहून ते पुढे सरसावले. फौजेतून एकटे बाहेर पडून पुढे सरसाऊ लागले आणि कमांडरवर हल्ला केला. त्याला वाटले ते एकटे येत आहेत. शक्यतो समझोता करावयाचा असेल. एका कमी वयाच्या तरुणाची एकटे पुढे येण्यासाठी हिम्मत व धाडस होऊच शकत नाही.

अब्दुल्लाह (र) यांनी हल्ला करून त्याचे शीर धडा वेगळे केले आणि तलवारीच्या टोकावर घेवून आले आणि सर्व फौज पाहात राहिली.

प्रश्न : १) रोमन कमांडरने कोणती घोषणा केली होती? त्याचा काय परिणाम झाला?

२) अब्दुल्लाह (र) यांनी काय सांगितले?

३) रोमन सरदाराच्या कमांडरचा डरपोकपणाला त्यांनी कसा ओळखला?

हरामापासून सुटका

माननीय अबू बकर यांचा एक गुलाम होता. त्याने काही कमाई करावी यासाठी त्याला ते प्रोत्साहन देत असे. तो मेहनतीने काही कमवत असे आणि आपल्या कमाईचा काही हिस्सा अबू बकर (र) यांच्या साठी बाजूला काढून ठेवत असे. त्याला ते खर्च करत असत.

एकदा गुलामाला मजूरीत खाण्याची वस्तू मिळाली. त्याने नेहमीप्रमाणे त्यातील एक हिस्सा अबू बकर (र) यांना दिला. त्यांनी खाण्यासाठी सुरवात केली तेव्हा गुलाम म्हणाला.

"तुम्ही हे जे काही खात आहात, काय तुम्हाला माहित आहे की मला हे कशा प्रकारे मिळाले आहे.?"

"मला काय माहितं तुच सांग कशा प्रकारे मिळाले." अबू बकर (र) म्हणाले. गुलाम म्हणाला, "मी इस्लाम स्वीकारण्याअगोदर एक माणसासाठी भविष्य सांगितले होते. भविष्य सांगणे मला तर माहित नव्हते. मी फक्त त्याला धोका दिला होता. तो माणूस आज भेटला आणि त्याने भविष्य सांगण्यासाठीचा मोबदला म्हणून ही खाण्याची वस्तू दिली जे आपण खात आहात."

त्यांनी हे ऐकल्यावर त्यांचा चेहरा लाल झाला. त्वरित उठून उभे राहिले आणि जे काही खाल्ले होते ते सर्व घशात बोट घालून बाहेर ओकून दिले. आता तुम्हीच विचार करा हरामाने कमावलेली वस्तू ते आपल्या घशा खाली कशी जाऊ देणार होते?

मूल्यपाठ क्रमांक ५

मेहनत मजूरी

एकदा आदरणीय प्रेषित (स) बसलेले होते. एव्हढ्यात तिथे एक सहाबी आले. सलाम केला, प्रेषित (स.) त्यांना प्रेमपूर्वक भेटले. प्रेषित (स.) आपल्या साथीबरोबर प्रेमाने वागत असत. त्या सहाबीचा हाथ धरून बसवू लागले. तर काय पाहता की हाथ काळे झालेले आहेत. प्रेषित (स.) यांनी विचारले, "काय बन्धु ! तुमच्या हातावर काही लिहिलेले आहे काय? हातावर काळे डाग आहेत." साथीदाराने सांगितले, "नाही महाशय ! असे नाही, मी आपल्या मुलाबाळांचा उदरनिर्वाह करण्यासाठी दगड फोड करीत असतो. त्याच मजदूरीवर आमचे पोट अवलंबून आहे. हातोड्यामुळे माझे हाथ काळे पडले आहेत. हे सर्व घट्टे आहेत. हातावर मी काहीच लिहिलेले नाही."

साथीदाराचे (सहाबी) ऐकून प्रेषित (स) फार आनंदित झाले आणि त्यांच्या हाताचे चुंबन घेतले. असे का घडले नसते. एक गरीब कुणा समोर हात पसरत नाही. ही एक आनंदाची बाब आहे. धोकाधडीने आणि बेईमानी करून पैसे कमवित नाही तर मेहनत मजदूरी करून आपले आणि आपल्या मुला बाळाचे पोट भरत आहे. ते एवढी मेहनत मजदूरी करतात की हाथ काळे पडतात. आदरणीय प्रेषित (स) यांच्या दृष्टीने ही एक अभिनंदनीय गोष्ट होती. ह्याच मुळे त्यांनी त्या हाताचे चुंबन घेतले.

मागणे नको

मनुष्याला अल्लाहने श्रेष्ठ दर्जा दिला आहे. त्याला आपला नायब बनविला आहे. त्याला जगभराची साधन सामुग्री दिली. भल्या माणसाला हे कसे शोभून दिसेल की त्याने दुसऱ्यासमोर हात पसरून स्वत: चा अपमान करून घ्यावा ? ह्याचसाठी प्रेषित (स.) आपल्या सर्व साथीदारांना स्वाभिमानी बनवत असत जेणेकरून त्यांनी अल्लाहचे आदेश तंतोतंत पाळावेत.

एकदा काही सहाबी प्रेषित (स.) यांच्याजवळ आले ते सर्वजण नव मुस्लिम होते. प्रेषित (स.) यांनी त्यांच्या पुढे अनेक अटी ठेवल्या त्यातील एक अट ही होती की तुम्ही दुसऱ्यापुढे हात कधी ही फैलावणार नाही आणि कुणाकडेही काहीही मागणार नाही.

सहाबा (र) हा उपदेश सक्तीने आचरणात आणत असत. ते जर उंटावर स्वार होवून चालत आणि त्यांच्या हातून चाबूक खाली पडला तरी ते पायदळी चालणाऱ्यांना चाबूक उचलून देण्यासाठी विनंती करीत नसत. ते उंटाला खाली बसवून चाबूक स्वत: घेत असत.

एकदा माननीय अबू बकर (र.) उंटनीवर स्वार होवून कुठेतरी जात होते. त्यांच्या हातून लगाम खाली पडला. त्यांनी उंटनीला खाली बसविले व खाली उतरून लगाम उचलून घेतला. लोकांनी विचारले. "महाशय ! आपण त्रास का घेतला. आम्हाला का नाही सांगितले. आम्ही उचलून दिले असते."

"कुणाजवळ काही मागणे मोमीनला शोभा देत नाही. मी माझा दोस्त प्रेषित (स.) यांना वचन दिलेले आहे की दुसऱ्या कुणाकडे काहीही मागणार नाही." अबू बकर म्हणाले.

प्रश्न : १) स्वाभिमानाला ठेस कधी लागते?

२) प्रेषित (स.) आपल्या अनुयायांना कसे पाहू इच्छित होते?

३) भीक मागणे मोमीनसाठी अशोभनिय कसे आहे?

४) अबू बकर (र) यांनी स्वत: चा बुक का उचलला?

५) लोकांना त्यांनी काय उत्तर दिले?

६) ह्या कथेपासून काय बोध मिळतो?

मूल्यपाठ क्रमांक ७

नि:संकोचपणा

चाचा सादी (रह) हे महान विद्वान आणि प्रसिध्द फारसी कवी होते. ते राहाणारे शिराज गावाचे होते. शिक्षण घेण्यासाठी मात्र त्यांनी लांबलांबचा प्रवास केला. अनेक भाषा त्यांना अवगत होत्या. ते भारतात सुध्दा येवून गेले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यापैकी गुलिस्ताँ, बोस्ता प्रसिध्द ग्रंथ आहेत.

एकदा चाचा सादी प्रवासात एका शहरात आले. त्या शहरात त्यांचा एक दोस्त राहत होता. ते आपल्या दोस्ताच्या घरी थांबले. दोस्ताने चांगला पाहुणचार केला. चाचासादीसाठी चांगली पकवाने बनविली. जेव्हा जेवण समोर आले तेव्हा चाचा म्हणाले,

"हाय दावते शीराज"

हे ऐकूण मित्राला आश्चर्य वाटले. विचार करू लागला की शक्यतो शीराजचे पक्वान्न चांगले असेल म्हणून त्याने दुसऱ्या दिवशी ह्यापेक्षा ही जास्त चांगले पक्वान्न बनविले. जेव्हा जेवण समोर आले तेव्हा सुध्दा चाचा म्हणाले,

"हाय दावते शीराज"

आपल्या दोस्ताचा हा उत्तम पाहुणचार पाहून चाचा लवकरच तेथून निघाले.

काही काळानंतर हाच दोस्त शीराज चाचाच्या घरी आला विचार केला "दावते शीराज" काय असते ते आता पाहूया. चाचा सादी आपल्या दोस्ताला कडकडून भेटले आणि आनंद प्रकट केला. परंतु जेव्हा जेवणाची वेळ झाली तेव्हा नेहमी प्रमाणे डाळभात समोर आणून ठेवला आणि म्हणाले, "अल्लाह, असीम दयावंत व कृपावंत च्या नावाने सुरु करा" आणि स्वत:खावू लागले.

दोस्ताला आश्चर्य वाटले. तो काही सांगणारच होता तर चाचा म्हणाले,

"बंधू ! मी तुझ्याघरी दावते शीराज बद्दल उसासे टाकले होते. त्याचा अर्थ होता की खाण्यासाठी संकोच करू नये. कारण पाहुणे येऊन जास्त थांबू नये, पाहुण्यांना संकोच वाटू नये. तुमच्या खाण्यासाठीचा संकोच पाहुन मला दुःख झाले. म्हणून मी तुमच्याकडे जास्त दिवस राहू शकलो नाही.

जबाबदारीची जाणीव

माननीय उमर (र) मुस्लिमांचे राज प्रमुख खलीफा होते. राजप्रमुखाचे कर्तव्य आहे की त्याने प्रजेची देखरेख करावी. ते स्वत: चे कर्तव्य पूर्ण जाणून होते. कर्तव्यपूर्ती साठी ते सतत प्रयत्नशील राहत असत. दिवसरात्र मेहनत करीत असत. दिवसाआपले काम ते पार पाडीत आणि रात्री फार कमी झोपत असत. रात्री ते प्रजेच्या देखरेखीसाठी गस्त घालीत असत.

एकदा ते गस्त घालण्यासाठी बाहेर पडले. फिरता फिरता दूर गेले. परततांना रस्त्यात एक झोपडी दिसली. त्या झोपडीत एक स्त्री चूल पेटवित होती. चूलीवर एक भांडे ठेवले होते आणि तिची मूलं रडत होती. ती स्त्री त्या मूलांचे सांत्वन करत होती. परंतु मुलं काही केल्या रडणं थांबवत नव्हती. मुलांचे रडणे ऐकून उमर (र) यांना दु:ख झाले. ते जवळ गेले आणि त्यांनी निरीक्षण केले. परंतु त्यांना कळलेच नाही की काय होत आहे. त्यांनी त्या स्त्री जवळ जावून मुलांच्या रडण्याचे कारण विचारले. तिनं सांगितलं की मुलं भुकेने व्याकुळ आहेत.

उमर (र) यांनी विचारले, "तू त्यांना खावू का घांलीत नाही? मी इतक्या वेळे पर्यंत उभा राहून पाहात आहे की चुली वर भांडे आहे. तुझा स्वंयपाक कधी होणार आहे?"

"चुलीवरील भांड्यात काहीच नाही. मुलांचे सांत्वन करण्यासाठी फक्त चुलीवर भांडे ठेवले आहे. ह्यांना कशी तरी झोप लागावी तो पर्यंत मी वाट पाहत आहे." स्त्रीने उत्तर दिले.

उमर (र) यांनी पाहिले तर खरोखरच चुलीतील भांड्यात काही पानी आणि लहाण लहाण दगड ठेवलेले आहे कारण त्या स्त्री जवळ खाण्यासाठी काहीच नव्हते. मुलं भुंकेने व्याकूळ होती. मुलांच्या समाधानासाठी तिने चुलीवर भांडे ठेवून त्यात पाणी आणि दगडाचे तुकडे टाकले होते. जेणे करून मुलांना कळावे की जेवण तयार होत आहे. मुलांना काही वेळानंतर झोप येईल आणि ते झोपतील. अशा प्रकारे रात्र जाईल. स्त्री विधवा होती मुलं अनाथ होती. घरात कमावता कोणीच नव्हता. सरकारी खजीन्यातून रक्कम देण्याचे सुध्दा ठरले नव्हते. दु:खी आणि कष्टी हे दृस्य पाहून उमर (र) यांचे डोळे पानावले, त्यांना अतिव दु:ख झाले. दु:खी मनाने ते म्हणाले.

"माई, तू राज प्रमुखाला (खलीफा) खबर का दिली नाही?"

"माझ्या आणि उमर (र) मध्ये निर्णय अल्लाह लावील. मी स्त्री जात कुणाकुणाकडे जाऊन सांगू. राजप्रमुखाचं कर्तव्य आहे की त्याने प्रजेची काळजी घ्यावी. तो जर आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ आहे तर तो राजप्रमुख का बनला?" स्त्रीने उत्तर दिले.

उमर (र) यांच्यावर जणु काही दु:खाचे डोंगर कोसळले. ते हे सर्व ऐकून त्वरित राजकोष गृहात गेले आणि पीठ, मटन, तूप आणि खारकं भरलेलं पोतं घेवून चालू लागले तेव्हा गुलाम म्हणाला.

"का कष्ट घेता, मी हे सर्व पोच करून देतो."

"नाही, परलोकात तू माझे ओझे वाहू शकत नाही. तर आज मी तुला माझे ओझे वाहण्यास का म्हणून सांगू." खलीफा असे म्हणत ते पोते घेवून स्वत: त्या स्त्रीकडे गेले. स्वत: तिथे बसून चूलीला फूंकर घातली. स्वयंपाक करून मुलांना पोट भर जेवण घातले. मुलं हसत खेळत झोपी गेले. जातांना त्या स्त्रीने सांगितले,

"खलीफा होण्यासाठी तुम्ही लायक आहात उमर (र) नाही."

उमर (र) यांनी सांगितले, "माई माफ करं, उमर मीच आहे. माझी चूक झाली की आता पर्यंत मी तुझी खबर घेतली नव्हती.

ह्या नंतर माननीय उमर (र) यांनी राजकोषातून त्या स्त्रीसाठी आणि तिच्या मुलांसाठी अनुदान देण्यास मंजूरी दिली.

प्रश्न : १) उमर (र) यांचा कोणता नियम होता?

२) स्त्रीशी काय बोलणे झाले?

३) मुलांचे समाधान करण्यासाठी स्त्रीने काय केले?

४) उमर (र) यांनी कशा प्रकारे मदत केली?

५) जातांना स्त्री काय म्हणाली?

मूलासाठी त्याग

हिंदुस्थानात मुगलांचे राज्य फार काळापर्यंत होते. मुगलांचा प्रथम बादशाह बाबर होता. तो आपला मुलगा हुमायूनशी फार प्रेम करत असे.

एकदा हुमायून फार आजारी पडला. त्यावेळी तो संभळ मध्ये होता. बाबरने त्याला आग्रा येथे येण्यासाठी बोलावणे पाठविले. रस्त्यात अतिदक्षता घेण्यात आली. तरी सुध्दा आगऱ्याला पोहचता पोहचता हुमायूनचा आजार बळावला. परिस्थिती हाताबाहेर गेली. बाबरला फार काळजी वाटू लागली. दिन प्रतिदिन तब्येत बिघडतच गेली. हुमायूनच्या आईला बाबरचे दु:ख पाहावेना. ती बादशाहाला समजावू लागली की "इतके दु:खी होऊ नका आणि घाबरू नका. तुमची आणखीन मुले आहेत. तुम्ही बादशाह आहात बादशाहाने असे दु:खी होऊ नये."

बाबर म्हणाला, "तुमचे म्हणणे बरोबर आहे. मी बादशाह जरूर आहे परंतु पिता सुध्दा आहे. आपल्या मुलाचे दु:ख कसे सहन करू?"

जेव्हा हुमायूनची तब्येत फारच खराब झाली आणि जगणं कठीण झालं तेव्हा बाबरने आपल्या दरबारी लोकांना बोलावून घेतले आणि विचारले,

"आता हुमायूनसाठी काय करावे?" लोकांनी वेगवेगळी मतं मांडली. एकाने सांगितले, "आपण आपली अतिप्रिय वस्तू हुमायूनच्या बदल्यात दान करा. अल्लाह हे कबूल करील आणि हुमायून वाचेल."

बाबरच्या मनात हे पक्के बसले त्याने विचारले, "माझ्या खजाण्यात अमूल्य असे काय आहे जे मी दान करेन?

लोकांनी सांगितले, "हिरे, दागदागिणे आणि पैसे यांना गरीबामध्ये दान करून टाका." बादशाहाला हे उत्तर आवडले नाही. त्याने विचार केला, "माझी सर्वात अमूल्य वस्तू माझा जीव आहे. मुलासाठी मला तर माझा जीव द्यायला पाहिजे."

विचार करून बाबरने उपवास (रोजा) ठेवला, नमाज अदा केली आणि हुमायूनच्या खोलीत गेला. तीनदा त्याच्या पलंगाला चक्कर मारली. चक्कर मारतांना अल्लाहशी प्रार्थना केली की, 'हे अल्लाह ! माझ्या मुलाचा जीव वाचव आणि त्याबदली माझा जीव घे." अल्लाहने त्याची प्रार्थना कबूल केली. हुमायून हळू हळू बरा होऊ लागला. आता बाबर आजारी पडला आणि काही दिवसानंतर त्याचा त्याच आजाराने मृत्यू झाला.

प्रश्न : १) बाबर कोन होता ? हुमायूनच्या आजारात त्याने काय केले?

२) दरबारी लोकांनी काय सल्ला दिला?

३) बाबरने मुलासाठी जीव कसा दिला?

मूल्यपाठ क्रमांक १०

काळजी घेणे

माननीय अबू बकर (र) यांची राहणी साधी होती. स्वत: काम करत आणि दुसऱ्यांची सेवा करीत असत. ते कपड्यांचे व्यापारी होते. खलीफा बनल्यानंतर सुध्दा त्यांनी आपला व्यापार सुरुच ठेवला होता. कपड्यांचे गाठोडे खांद्यावर घेवून ते बाजारात आणि गल्ली बोळात फिरत असत. ह्या मिळकतीतून त्यांचा रोजचा खर्च भागत असे. खलीफा (राजप्रमुख) झाल्यामुळे त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. आता व्यापार करण्यासाठी वेळ मिळत नसल्यामुळे त्यांना व्यापार सोडावा लागला. राजकोषातून लोकांच्या मंजूरीने फारच थोडी रक्कम ते स्वत:साठी घेत असत.

एके दिवशी त्यांच्या पत्नीने विचारले, "हे राज प्रमुख ! आज माझं मन गोड खाण्यास होत आहे. तुम्ही काही गोड मिठाई मागविली तर बरे होईल!"

"राजकोष ह्यासाठी नाही आणि माझ्याजवळ सुध्दा पैसे नाही की मी मिठाई खरेदी करेन" राजाने पत्नीला उत्तर दिले.

हे ऐकून पत्नी गपचूप बसली आणि राजकोषातून मिळत असलेल्या रक्मेतून दररोज बचत करून एके दिवशी मिठाई मागविली. जेवणासोबत मिठाई वाढली तेव्हा खलीफांनी विचारले,

"तुम्हाला मिठाई कोठून मिळाली?"

त्यांच्या पत्नीने सर्व हकीकत सांगितली. अनेक दिवस बचत करून मिठाईसाठी पैसे जमा केले. खलिफांनी सांगितले तू दररोज बचत करत राहीली आणि घरात कुणालाही जाणवले नाही की दररोजच्या खाण्यात काही फरक पडला आहे. ह्याचाच अर्थ असा होतो की आम्ही राजकोषातून एवढी रक्कम जास्त घेत आहोत.

ह्यानंतर खलीफाने आपल्या मानधनातून तेव्हडी रक्कम कमी केली.

प्रश्न : १) अबु बकर (र) यांच्या उदरनिर्वाहची काय व्यवस्था होती?

२) पत्नीशी त्यांची काय बातचीत झाली?

३) आपल्या मानधनात त्यांनी कमी का केली?

मूल्यपाठ क्रमांक ११

शांती साठी प्रयत्न

इस्लामपूर्व अरब लोक फार भांडखोर होते. शुल्लंक गोष्टींवरून ते आपापसात भांडत असत. एखाद्या बाजू कडील मनुष्य मारला गेला तर त्याचा बदला घेण्यासाठी लढत असत. अशा प्रकारे दररोज लढाया होत असत. जेव्हा एखाद्या दिवशी लढाईचा भडका उडाला तर तो वर्षानुवर्षे शांत होत नसे आणि अरबांच्या मोठ्या भूभागावर अशांतता आणि शत्रुत्व राहत. देशात अशांती नेहमी राहत असे. हजारो माणसे मारली जात होती. कुणाला ही आपले, आपल्या कुटूंब सदस्यांचे, नातेवाईकांचे जीवसुरक्षित वाटत नसे.

ह्या खुनखराब्याचा परिणाम सहस्त्र स्त्रिया विधवा बनत आणि हजारो मुलं अनाथ होत असत. ह्या विधवांची आणि अनाथांची काळजी घेणारा कुणीही नसे. अत्याचारी लोक त्यांना त्रास देत असत. गुलामांचे हाल ह्यांच्या पेक्षा सुध्दा वाईट होते. त्यांच्याशी जनावरासारखे वर्तन केले जात असे.

प्रेषित (स.) आता बाल्यावस्थेतच होते. त्यांना अल्लाहने प्रेषित म्हणून नियुक्त सुध्दा केलेले नव्हते. ते सुरवातीपासुन सदाचारी आणि नेक होते. अशा प्रकारच्या दु:खी गोष्टींना पाहून ते त्रस्त होत असत. ते ह्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहत होते की लढाई, भांडणतंटे कोणत्याही प्रकारे होऊ नयेत आणि देशात अशांती माजू नये. एकदा काळ्या दगडाला (हजरे असवद) काबागृहाच्या भिंतीत लावण्यासाठी कुरैशच्या सरदारांमध्ये लढाई होण्याची वेळ येऊन ठेपली. तेव्हा प्रेषित (स.) यांनी त्या भांडणाला शांती पूर्वक मिटविले होते. त्यांनी स्वत:च्या हाताने एका चादरीत तो काळादगड ठेवला आणि सर्व सरदारांना चादर धरून उचलण्यास सांगितले. प्रेषित (स.) यांनी नंतर तो दगड स्वत:च्या हाताने

भिंतीत ठेवला. अशा प्रकारे प्रेषित (स.) यांनी अरबांना एका मोठ्या आपत्ती पासून आणि खून खराब्यापासून वाचविले होते.

ह्याच काळात एक विदेशी व्यापारी मक्का येथे व्यापाराचे सामान घेवून आला. लोकांनी त्याचे सामान घेवून आपापल्या घरात ठेवले आणि त्याला पैसे कुणीही दिले नाही. तो रडत रडत अनेकांकडे गेला परंतु कोणीही त्याची मदत केली नाही. एका विदेशी व्यापाऱ्याची ही स्थिती पाहून प्रेषित (स.) यांना अतिव दु:ख झाले. प्रेषित (स.) अशा प्रकारच्या अत्याचारापासून सुटका होण्यासाठी युक्ती करत असत.

अरब लोकांपैकी काही सदाचारी लोकांनी समझोता केला होता. त्या समझोत्याचे नाव "हल्फुल फिजूल" होते. त्याच्या सदस्यांनी पीडित आणि अत्याचारी लोकांची मदत करण्यासाठीची शपथ घेतली होती. लोक त्या शपथेला विसरून गेले होते. प्रेषित (स.) यांनी कबील्यांच्या सरदारांना आणि समझदार लोकांचे लक्ष देशाच्या ह्या नैतिक अध:पतनाकडे, लुटमारीकडे, दुर्वतनाकडे, रस्तातील लुटमारीकडे, गरीब, प्रवासी आणि असहाय लोकांशी वाईट वर्तनुकीकडे आकृष्ठ केले. त्यांच्या सुधारणे साठी लोकांना प्रवृत्त केले. शेवटी एक कमेटी स्थापन करण्यात आली ज्यामध्ये बनू हाशीम बनू मुत्तलिब बनूअसद, बनू जुहरा आणि बनूतमीम नामक टोळ्या सामील होत्या. ह्या कमेटीचे सदस्यांना शपथ दिली गेली होती. ती खालील प्रमाणे

१) आम्ही देशातून दूर्व्यहाराला नाहीशे करू

२) आम्ही प्रवाशांची मदत करू

३) आम्ही गरीब आणि असहायांची मदत करू

४) आम्ही शक्तीशाली लोकांना शक्तीहीन लोकांवर अत्याचार करण्यापासून रोखू.

ह्या युक्तीमुळे देशातील नैतिक अध:तन दूर झाले. लोकांचे वित्त आणि जीवांचे रक्षण होवू लागले. प्रेषित (स.) नेहमी सांगत असत.

"मी आज सुध्दा त्या समझोत्यानुसार वागण्यास तयार आहे."

प्रश्न : १) हल्फूल फिजूलच्या विषयी तुम्ही काय जाणता?

२) प्रेषित (स.) अत्याचार आणि उपद्रवांपासून मुक्ती मिळण्यासाठी काय युक्ती करत?

३) प्रेषित (स.) यांनी शांती स्थापन करण्यासाठी काय युक्ती केली?

४) समझोत्याच्या अटी कोणत्या होत्या?

संयम

आदरणीय प्रेषित यांच्या एका साथीचे (सहाबी) नाव अबूतलाहा (र.) होते. त्यांची पत्नी फार नेक होती. त्यांचा एक लहानगा होता. ते मूल फार सुंदर होते. एके दिवशी ते मूल आजारी पडले. काही दिवसांच्या आजारा नंतर ते मूल मरण पावले.

त्या सुंदर मूलाच्या निधनानंतर आईला अतिव दु:ख झाले होते. परंतु ती एक संयमी स्त्री होती. तिने मूलाच्या शवाला एका कापडात गुंडाळून एका बाजूला ठेवले आणि आपल्या घराकामाला जुंपली.

थोड्यावेळाने तिचे पती घरात आले. त्यांनी जेवण घेतले नव्हते. त्यांना फार भूख लागली होती. घरात आल्यानंतर त्यांनी मुलाच्या तब्येती विषयी विचारले. पत्नीने संदिग्ध उत्तर दिले. पतीचे जेवण झाल्यानंतर तिने सांगितले,

"पतीराज ! एकाने दुसऱ्याला एखादी वस्तू उधार काही दिवसांसाठी दिली, मुदत संपल्यानंतर त्या व्यक्तीने आपली वस्तू परत मागितली तर काय उधार घेणाऱ्याने नकार दिला पाहिजे? पती म्हणाला, "निश्चित नाही जेव्हा खरा मालक आपली वस्तू परत मागत आहे तर त्याला नकार दिला जावू शकत नाही."

पत्नीने आता धाडसाने सांगितले, "ते हसत खेळत असलेले मूलं ज्याला अल्लाहने आम्हाला अमानत म्हणून दिलेले होते, त्याला अल्लाहने आज परत घेतलेआहे. तुम्ही संयम राखा आणि मूलासाठी कफन व दफनची व्यवस्था करा."

कफन दफन झाल्यानंतर दोन्ही अल्लाहच्या प्रेषितांकडे गेले आणि त्यांना सर्व हकीकत सांगितली. पती पत्नीच्या संयमी वृत्तीमुळे प्रेषत (स) फार प्रभावित झाले. अल्लाहजवळ प्रार्थना केली. काही दिवसानंतर तलाहा (र) यांच्या घरी आणखी एक मूल जन्माला आले. त्याचे नांव अब्दुल्लाह ठेवण्यात आले. पुढे हेच एक प्रसिध्द विद्वान आणि सदाचारी व्यक्ती बनले. त्यांनी आपल्या आईवडीलांचा नाव लौकिक वाढविला. अल्लाहने त्यांच्या आईच्या संयमी वृत्तीचा बदला असा महान दिला.

शेजार धर्म

एक मोठे संत होऊन गेले त्यांचे नाव अब्दुल कादीर (रह) होते. ते जिलानचे रहिवाशी होते. ह्याच मुळे त्यांना जिलानी सुध्दा म्हटले जाते. काहीजण त्यांना मोठे पीरसाहेब (बडेपीर) म्हणून सुध्दा ओळखतात. ते महान संत होते. अल्लाहची कृपा त्यांच्यावर होवो.

त्यांच्या शेजारी एक यहुदी राहात होता. जेव्हा ते नमाज अदा करत अथवा कुरआन पठण करत तेव्हा तो यहुदी गोंधळ माजवित असे. नेहमी अशा वेळी वाजंत्री वाजवित असे जेणे करून शेख साहेबाच्या उपासनेत अडथळा निर्माण होईल. ते यहुदीचा सर्व प्रकारचा त्रास सहन करत होते. त्याला ते स्वत:ही रोखत नव्हते की दुसऱ्याला सुध्दा तसे करू देत नव्हते.

एके दिवशी यहुदीला अटक झाली आणि त्याला बंदीवास झाला. शेख साहेबांना याची माहिती नव्हती. त्यांना हे कळल्यानंतर ते त्वरित न्यायालयात गेले आणि न्यायाधिशांना विनंती केली की माझ्या शेजाऱ्याचा गुन्हा दंड भरून माफ होत असेल तर मी तो दंड भरावयास तयार आहे. दाव्याची नव्याने पुन्हा पहाणी करून घेण्याची विनंती केली जेणे करून तो निर्दोष असेल तर त्याची सुटका होईल. न्यायाधिशाने यहुदीच्या दाव्याची कागदपत्रे मागावून घेतली आणि त्यांची छाननी व पहाणी केल्यानंतर यहुदी निर्दोष असल्याचे आढळले. तो यहुदी मुक्त झाला आणि त्याला सोडून देण्यात आले.

शेख अब्दुल क़ादिर (रह) यांच्या ह्या उत्तम वर्तणुकीचा प्रभाव यहुदीवर फार पडला. त्यांच्याकडे जावून आपल्या कुकर्माची स्वत:माफी मागितली. तो म्हणाला,''मी आपणास फार त्रास दिला. नेहमी तुमच्या प्रार्थनेत मी अडथळा आणत होतो. माझ्या कैदेवर आपण खुश व्हायला हवे होते. परंतु ह्या

कठीणसमयी आपण बदला घेण्या ऐवजी माझी मदत केली. आणि मला कैदेतून मुक्त केले. तुमच्या ह्या वर्तणुकीचा माझ्यावर अति प्रभाव पडला. ईश्वरासाठी तुम्ही मला क्षमा करावी. मी कधीच आपल्याला त्रास देणार नाही.

शेख साहेबांनी उत्तर दिले, "मी तुमच्यावर कोणते ही उपकार केले नाही. मला दु:ख ह्याचे आहे की मी यापेक्षा जास्त तुमची मदत करू शकलो नाही. इस्लाम मध्ये तर शेजाऱ्याचा फार मोठा हक्क सांगितला गेला आहे."

हे ऐकून यहुदी तर अतिशय प्रभावित झाला आणि म्हणाला,

"खरोखरीच इस्लाम सत्य धर्म आहे. मी आता इस्लामचा स्वीकार करीत आहे." यहुदी महामंत्र कलिमा पठण करून मुस्लिम झाला.

प्रश्न : १) मोठे पीर साहेबांचे पूर्ण नाव काय आहे?

२) त्यांचा शेजारी कशा प्रकारचा मनुष्य होता?

मूल्यपाठक्रमांक १४

पाहुणचार

एकदा भुकेने व्याकूळ एक साथी (सहाबी) प्रेषित (स) यांच्याकडे आले. प्रेषित (स) यांनी त्याना जेऊ घालण्यासाठी सांगितले परंतु घरात त्यावेळी फक्त पानी शिल्लक होते. प्रेषित (स) यांना हे काही नवीन नव्हते. प्रेषित (स.) यांच्या घरी नेहमीच जेवणासाठी काही नसे आणि त्यांना उपासी राहावे लागत असे. आता काय करावे? त्यावेळी काही सहाबी (साथी) प्रेषितां सोबत बसलेले होते. प्रेषित (स.) यांनी सांगितले, "आजच्या रात्री ह्या पाहुण्यासाठी जेवण देण्यास कोण तयार आहे.?"

माननीय अबू तलाहा (र) यांनी उत्तर दिले की, "हे अल्लाहचे प्रेषित (स.) मी ही जबाबदारी घेतो." आणि पाहुण्याला घेवून ते आपल्या घरी गेले. घरात विचारल्यावर कळले की येथे सुध्दा तीच स्थिती आहे. फक्त मुलांसाठी थोडेसे जेवण राखून ठेवले आहे. त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले, "तुम्ही मुलांना कसे तरी झोपी घाला आणि जेव्हा मी पाहुण्याला घरात आणिल तर दिवा दुरुस्त करण्याच्या बहाणा करून दिवा विझवून टाका. आम्ही पाहुण्याबरोबरच जेवायला बसू. जेवण पाहुण्याला देऊ आणि आपण जेवण घेण्याचा हावभाव करून उपाशी राहू. पाहुण्याला अंधारात काहीच दिसणार नाही. तो पाहुणा समजून घेईल की घरातील लोकांनी सुध्दा आपल्या बरोबर जेवण घेतले. अशा प्रकारे तो चांगल्या प्रकारे जेवून घेईल व ह्यामुळे पाहुणा पोटभरून जेवण करील.

आज्ञाधारक पत्नीने असेच केले. बहाणा करून दिवा विझवून टाकला. पाहुण्याच्या बरोबर सर्व बसले. पाहुण्याला वाटले की सर्वजण जेवण करीत आहेत. पाहुण्याने पोटभरून जेवण केले. घरातील सर्वजण उपासी राहिले. घरातील लोक

खुष होते की पाहुण्याने पोटभरून खाल्ले आणि आम्ही उपाशी असल्याचे त्याला माहीत सुध्दा पडले नाही. नाही तर पाहुणा दु:खी झाला असता.

सकाळी अबुतलाहा (र) प्रेषित (स) यांच्याकडे गेले. तेव्हा प्रेषित (स) म्हणाले, "तलाहा ! रात्रीच्या तुमच्या उत्तम अशा वर्तणुकीने अल्लाह प्रसन्न झाला आहे आणि खालील कुरआनोक्तीचे अवतरण झाले की,

"ते दुसऱ्यांना आपल्यावर प्राधान्य देतात मग ते उपाशी का असेनात."

(कुरआन)

किती ईमानदार ?

माननीय अली (र) यांच्या कारकिर्दीतील ही सत्य घटना आहे. एकदा सरकारी खजिण्यात मोत्याचा हार आला. त्या हारासंबंधी माहिती अली (र) यांच्या मुलीला झाली. ईद जवळ येऊन ठेपली होती. मुलीने विचार केला की ईदच्या दिवशी सर्व मुली नवीन कपडे आणि सुंदर दागदागिणे अंगावर चढवितात. मी सरकारी खजिण्यातील मोत्याचा हार मागविन आणि स्वत: गळ्यात घालीन. ईद संपल्यानंतर तो हार मी परत करून टाकीन. त्या मुलीने राजकोषाध्याक्षाला सांगितले की तो मोत्याचा हार मला तात्पुरता ईद साठी द्यावा. ईद झाल्यावर मी तो हार त्वरित परत करीन.

तीन दिवसात परत करण्याच्या बोलीवर अधिकाऱ्याने तो हार मुलीला दिला. ईदच्या दिवशी मुलीने तो हार गळ्यात घातला. माननीय अली (र) यांनी तो हार मुलीच्या गळ्यात पाहिला. त्यांनी ओळखले आणि म्हणाले, "मी ह्या मुलीचे हात कापून टाकीन तिने राजकोषातून चोरी केली आहे."

मुलीने सांगितले, "मी हा हार अधिकाऱ्याच्या सम्मतीने तीन दिवसासाठी तात्पुरता घेतला आहे. मी त्याला उद्या परत देणार आहे. हे ऐकून अली (र) यांनी अधिकाऱ्याला बोलावून घेतले आणि विचारले, "काय तुम्ही रखवालदार असून मुस्लिमाच्या राजकोषात अफरातफरी करता?"

"मी असे का म्हणून करू? मी मुस्लिमाच्या राजकोषात अफरातफरी करूच शकणार नाही. मी कधीही असे केलेले नाही." अधिकारी म्हणाला.

"तुम्ही मोत्याचा हार माझ्या मुलीला का दिला?" अली (र) यांनी विचारले.

"मुलीने तीन दिवसा साठी ते मागितले होते म्हणून दिले. अन्यथा दिले नसते." अधिकाऱ्याने स्पष्टिकरण दिले." काय हा अफरातफरीचा प्रकार नाही." अली (र) यांनी विचारले. तुम्ही मुस्लिमांच्या परवानगी शिवाय असे का केले? तो हार त्वरित राजकोषात जमा करा. मी माझ्या मुलीच्या ह्या कृत्यावर फार नाराज झालो आहे. तिने तुम्हाला न विचारता तो हार घेतला असता तर मी तिचे दोन्ही हात कापले असते." ह्या नंतर तो हार मुली कडून मागवून राजकोषात त्वरित जमा करण्यात आला.

प्रश्न : १) मुलीने हार कसा मिळविला? अली (र) यांना कसे कळले?

२) अली (र) आणि अधिकाऱ्या मध्ये काय बोलणे झाले?

३) मुलीच्या ह्या कृत्यावर अली (र) का नाराज झाले?

मूल्यपाठ क्रमांक १६

बहादुरी

सुलतान सलाहुद्दीन एक मोठा बादशाह होऊन गेला. तो लहानपणापासून मोठा बहादूर होता. एकदा ख्रिस्ती लष्कराने हमला करून त्या शहराला नष्ट केले. संपत्ती आणि स्त्रियांना लुटून नेले.

सलाहुद्दीन कुमारावस्थेत होते. ख्रिस्ती लोकांचा अत्याचार पाहून ते अस्वस्थ झाले होते. ख्रिस्तींचा अत्याचार पाहून त्यांना अतिव दु:ख झाले. एका म्हाताऱ्या माणसाला घेवून ते बादशाह जवळ गेले. तेथील बादशाह ईमामुद्दीन जंगी नामक होता. मूसल ही त्यांची राजधानी होती. सुल्तान जंगी सुध्दा बहादुर बादशाह होता.

सलाहुद्दीन आणि तो म्हातारा मुसल शहराजवळ पोहचले. योगायोगाने त्याचवेळी सुलतान जंगी घोड्यावर बसून कुठेतरी जात होता. हे दोघे मोठमोठ्याने रडत होते. सुलतानने घोडा थांबवून त्यांच्या रडण्याचे कारण विचारले. त्यांनी सर्व परिस्थिती बादशाहजवळ सांगितली. बादशाहने विचारले,

"इतके भयंकर अत्याचार झाले आणि तुम्ही काहीच प्रतिकार केला नाही?"

सलाहुद्दीन वयानं लहान परंतु शूर होता. तो समोर येवून म्हणाला, "आम्ही काय करणार आमचा बादशाह मोठा बेफिकीर आहे. आमच्यावर अत्याचार होतो आणि तो झोपा काढत आहे. तो आमच्यासाठी काहीच करत नाही. आम्ही त्याच्याकडे तक्रार घेऊन चालली आहे."

हे ऐकून सुलतान घोड्यावरून ताडकन खाली उतरला आणि म्हणाला, "मीच तो दुर्दैवी बादशाहजंगी आहे. ज्याच्या प्रजेवर अतोनात अत्याचार होत आहे आणि मीच बेफिकीर आहे."

हे ऐकून सलाहुद्दीनने माफी मागितली आणि सर्व हकिकत तपशील वार सांगितली. बादशाह त्यांना घेवून किहुयामध्ये गेला. तिथे आरामशीररित्या त्यांना ठेवले. आपल्या सर्व सैन्याला जमा करून प्रजेची दुर्दशा ऐकविली. सर्वांना आव्हान केले. "उद्या सकाळी माझी तलवार प्रजेसाठी चमकेल. तुम्हापैकी कोण माझे साथ देईल?"

सर्व सैन्य आश्चर्यात पडले. रिहा हे शहर मुसल शहरापासून १०० मैलाच्या अतंरावार होते. रात्रीतून हे अंतर पार करणे आणि तिथे जाऊन हल्ला करणे कसे शक्य आहे ? बादशाहला काय झाले आहे? काय हे शक्य आहे ? ह्यावर सर्वजण विचार करीतच होते तर सलाहुद्दीन म्हणाला,

"आम्ही उद्या बादशाह बरोबर असू."

सर्वजण घाबरून सलाहुद्दीन कडे पाहू लागले. कोणी त्याची टवाळी करू लागले आणि म्हणाले, "बाळा, जा खेळत बस, हे युध्द आहे मुलांचा खेळ नाही."

सुलतान जंगीने हे ऐकले त्याचा चेहरा रागाने लाल बूंद झाला. मोठ्याने तो म्हणाला, "हा मूलगा खरे बोलत आहे. ह्याचा चेहरा सांगतो की तो माझी साथ देईल."

आता सैनिकांना लाज वाटू लागली. सर्वजण तयार झाले. दुसऱ्या दिवशी रिहा शहराच्या वेशी पर्यंत पोहचले. रिहाचा ख्रिस्ती बादशाह त्यावेळी आराम करण्यासाठी दुसऱ्या गावाकडे गेला होता. आता एक सुवर्ण संधी मिळाली. सुलतान जंगीने हल्ला केला. मोठे युध्द झाले ख्रिस्ती सैन्याचा सरदार मोठ्या दिमाखानं समोर आला. सुलतान जंगीने बार केला परंतु त्याने लोखंडाचे चिलखत घातले होते. चिलखत फाटली परंतु सरदार घायळ झाला नाही. सरदाराने मोठ्या जोरात सुलतान जंगीवर वार केला. तलवार सुलतान जंगीवर पडणारच होती

तितक्यात सलाहुद्दीन विजेसारखा मधे आला आणि चिलखतीच्या फाटलेल्या भागावर जोरात वार करून ख्रिस्ती सरदाराचे दोन तुकडे केले. सरदार मारला गेल्यावर ख्रिस्ती सैन्य सैरावैरा पळू लागले. रिहा शहरावर मुस्लिम सैन्याला ताबा मिळाला आणि मुस्लिम स्त्रियांना स्वतंत्र करण्यात आले. सलाहुद्दीन सारख्या लहान मुलाची बहादुरी पाहून सर्वजण त्याचे कौतुक करू लागले.

प्रश्न : १) सलाहुद्दीन कोण होता? तो सुलतान जंगीजवळ का गेला?

२) त्यांच्या तक्रारी वरून सुलतान जंगीने काय केले ? सैन्य कशा प्रकारे तयार झाले?

३) ख्रिस्ती सैन्याचा सरदार कसा मारला गेला? त्याचा परिणाम ख्रिस्ती सैन्यावर काय झाला?

४) रिहा शहर कशा प्रकारे जिंकले गेले? जिंकल्यानंतर काय घडले?

मूल्यपाठक्रमांक १७

भडक कपडे घालू नका

माननीय उमर (र) यांचा पोषाख नेहमी साधा होता. ते म्हणत असत की मला तीन गोष्टी आवडतात.

१) चांगल्या गोष्टीचा उपदेश करणे २) वाईट गोष्टींपासून रोखणे ३) जुने कपडे घालणे.

ते नेहमी जुन्या कपड्यात राहत. कधी कधी शर्टावर अनेक थिगळे लावलेले असत. त्यापैकी एक चमड्याचा थिगळा असायचा. ही त्यावेळची गोष्ट आहे जेव्हा जगातील सर्वात मोठे राष्ट्र ईराण आणि रोमला जिंकून जगाच्या अधिकांश भागावर इस्लामी राज्य होते. राजकोष भरपूर उपलब्ध होता. अशां परिस्थितीत मुस्लिमांच्या राजप्रमुखाचा फाटलेला पाषाख पाहून काहींना वाटले आता उमर (र) यांना आपला पोषाख चांगला ठेवला पाहिजे. फाटलेले आणि जुने कपडे त्यांनी घालणे बंद केले पाहिजे.

एक शिष्टमंडळ राजप्रमुख उमर (र) यांच्याकडे गेले. परंतु ते उमर (र) यांच्या स्वभावाशी चांगलेच परिचित होते. विषयाला सुरवात करण्याची कुणाचीच हिम्मत झाली नाही. शेवटी असे ठरले की त्यांच्या मुलीनेच सांगावे की यापुढे फाटलेले आणि जुने कपडे घालण्याचे त्यांनी सोडून द्यावे. त्यांच्या मुलीचे नाव हफ्शा (र) होते. त्या प्रेषित (स) यांच्या पत्नी होत्या. म्हणून एकीकडे मुलगी असून सुध्दा ते तिची काळजी घेत असत. हफ्शा (र) धाडस करून पित्याकडे गेली आणि ह्या विषयी जिद्द केली. पित्यावर दबाव टाकला. परंतु उमर (र) म्हणाले, "बेटी ! तुम्ही तर प्रेषित (स) यांच्या बरोबरीने राहिलेले आहात. त्यांच्यासाठी तुमच्या घरात काय खास व्यवस्था होती?"

हफ्शा (र) यांनी उत्तर दिले, "माझ्या खोलीत प्रेषित (स) यांना झोपण्यासाठी एक बाडदान होते. त्याची घडी करून जमिनीवर अंथरले जायचे आणि त्यावरच प्रेषित (स) झोपत असत. त्यांच्या शरीरावर घाव पडत असत. एकदा बारदानाच्या मी चार घड्या केल्या होत्या तेव्हा प्रेषित म्हणाले, "हफ्शा ! आज तुम्ही काय अंथरले आहे. मला झोप चांगलीच लागली." मी उत्तर दिले तेव्हा प्रेषित (स) म्हणाले, "ह्याला पूर्वीप्रमाणेच अंथरले जावे."

हे ऐकून उमर (र) यांनी सांगितले, काय हफ्शा ! ज्यांच्या पैगम्बरानी इतक्या कष्टाचे आणि साधे जीवन जगलेले आहे त्यांच्या अनुयायानी ठाठा माठात आणि भडक कपड्यात का म्हणून राहावे? तू माझ्यावर दबाव का टाकत आहेस?

हफ्शा (र) आपले म्हणणे एकून गप्प बसल्या आणि पुढे कधीच ह्यासाठी आग्रह केला नाही.

प्रश्न : १) माननीय उमर (र) कोण होते? त्यांची आवडती वस्तू कोणती होती?

२) ते कसे कपडे घालत? हफ्शा (र) यांनी कशाचा हट्ट धरला होता?

३) उमर (र) यांनी हफ्शा (र) यांना कसे समजावून सांगितले?

४) ह्या गोष्टीने तुम्हाला काय बोध मिळतो?

मूल्यपाठ क्रमांक १८

लोक कल्याणाची कामे

तुम्ही हारून रशिद यांचे नाव तर ऐकले आहे. अब्बासी घराण्यातील ते सर्वात मोठे बादशाह होते. त्यांच्या राणीचे नाव जुबेदा होते. ती नेक स्त्री होती. लोकांच्या भलाईच्या कामात तिला आवड होती. अरबस्तानातील वाळवंटातील पाण्याचे दुर्भिक्ष्य पाहून तिला दु:ख होत असे. विशेषत: मक्का आणि आजूबाजूच्या वस्ती साठीचा पाण्याच्या प्रश्नाला ती दूर करू इच्छित होती. तिने आपल्या राज्यातील मोठमोठ्या अभियत्यांना बोलावून घेतले आणि त्यांना सांगितले, "अशी युक्ती शोधा जेणेकरून मक्का शहरापर्यंत पाणी येईल आणि येथील लोकांचा पाण्याचा प्रश्न कायमचाच मिटेल." महाराणीच्या आदेशानुसार इंजिनीअर कामाला लागले. चहुकडे जल स्त्रोताचा तपास सुरू केला. बहुतालचा आराखडा तयार करून महाराणीला दाखविला. तायफच्या जवळील डोंगरातून एक झरा हुनैन कडे जातो. त्याला वळवून मक्का शहरापर्यंत आणता येईल. परंतु रस्यात मोठा डोंगर आडवा आहे. त्याला पोडून पाण्याचा स्त्रोत इकडे वळविणे सोपे नाही. यासाठी फार धन आणि मेहनत खर्च करावे लागेल.

"तुम्ही खर्चाची काळजी करू नका. जर एक कुदळी मारण्याची किंमत एक अशरफी जरी असेल तरी मी आनंदाने ह्या कामासाठी देईन." महाराणी म्हणाली.

आदेश मिळताच इंजिनिअर आपल्या कामाला लागले. काम सुरु झाले. तायफपासून मक्का शहरापर्यंत कालव्यासाठी जमिन खरेदी करण्यात आली. जवळचे सर्व झरे, तलाव आणि स्त्रोतांचा मिळून एक मोठा प्रवाह तयार केला गेला. नंतर कालवा काढून मक्का शहरापर्यंत पोहचविला गेला.

तीन वर्षांची सलग मेहनत आणि मोठी संपत्ती खर्च करून हा कालवा तयार केला गेला. महाराणीची इच्छा पूर्ण करण्यात आली. मक्का शहरापर्यंत कालवा निर्माण झाला. महाराणीची आठवण म्हणून ह्या कालव्याला जुबैदा कालवा हे नाव देण्यात आले. आजही तो कालवा उपलब्ध आहे.

महाराणीने जमजम विहीरीला सुध्दा साफ केले होते. त्यात सुध्दा विपुल पाणी आहे. त्यामुळे मक्कावासीयांचा पाण्याचा प्रश्न कायमचाच निकाली लागला.

नमाजची काळजी घेणे

औरंगजेब हिंदुस्थानचा बादशाह होऊन गेला. तो शहाजहानचा मुलगा आणि श्रेष्ठ विद्वान होता. तो एक समजदार शासक होता. त्याने भारतावर पन्नास वर्षे राज्य केले. अकबर द्वारा भारतात जे निधर्मीपणाचे आणि ईशद्रोहाचे वातावरण पसरले होते त्याला स्वच्छ करण्याचे कार्य पार पाडले. औरंगजेब देशाचे रीतीरिवाज आणि कायदे कानून चांगल्या प्रकारे जाणत होता. तो फार कष्टाळू आणि कार्यक्षम होता. राज्याचा संपूर्ण कारभार तो एकटाच पहात असे. त्याचे जीवन साधे आणि पवित्र होते. तो शरीयतचे काटेकोर पालन करीत असे. धर्मपंडितांचा तो आदर करीत असे. स्वत:च्या खर्चासाठी राजकोषातून तो कधीही पैसा घेत नसे. टोप्या शिवूण काम करून आणि पवित्र कुरआनचे हाताने लिखाण करून तो आपला उदर निर्वाह करत असे. त्याची नमाज कधीच सुटली नाही.

मोहियोद्दीन औरंगजेब नवजवान होता तेव्हाच शहाजहान ने त्याला काबूलच्या स्वारीवर पाठविले. ह्या बहादूर आणि शूर सरदाराने फौजेची मोर्चे बांधणी करून युध्द सुरु केले. जेव्हा घमासान लढाई होत होती. तेव्हा नमाजची वेळ झाली. औरंगजेब नमाज सोडू शकतच नव्हता. त्वरित तो हत्तीवरून खाली उतरला आणि लढाईच्या मैदानातच नमाज अदा करू लागला. नमाजसाठी त्याने आपल्या जीवाची पर्वा केली नाही की हारजीतची सुध्दा पर्वा केली नाही.

शत्रुने औरंगजेबचे हे साहस पाहिल्यानंतर दंग झाला. शत्रु विचार करू लागला की अशा साहसी आणि ईशपरायण माणसाशी मुकाबला करणे अवघड आहे. शत्रू औरंगजेबला शरण आला.

प्रश्न : १) शहाजहान कोण होता? औरंगजेबला काबूलला का पाठविले होते?

२) लढाईच्या मैदानात काय घडले?

३) ह्या कथेने औरंगजेबच्या चारित्र्याविषयी तुमचे काय मत बनले?

न्यायनिष्ठा

माननीय अली (र) एक प्रामाणिक आणि न्यायनिष्ठ खलिफा होते. त्यांचे शौर्यमहान होते. ते एकदा एका युध्दासाठी लष्करासोबत स्वारीवर होते. त्यांचे चिलखत रस्त्यात हरवले. युध्दा वरून परतल्या नंतर ते चिलखत त्यांना एका यहुद्याकडे सापडले. त्याने ते त्याच्याकडून मागितले परंतु यहुदीने चिलखत देण्यास नकार दिला.

अली (र) यांनी न्यायालयात शेवटी दावा दाखल केला. सुनावनीच्या वेळेस अली (र) स्वत: पक्षकार म्हणून हजर राहिले. न्यायाधिशासमोर ते आता एक सर्व सामान्य नागरिक म्हणून उभे होते. न्यायाधीशाने दोन साक्षीदार देण्यास सांगितले. अली (र) यांनी आपला गुलाम कम्बर आणि मुलगा हसन (र) या दोघांना साक्षी म्हणून सादर केले. न्यायाधिशाने दोघांपैकी कुणाची ही साक्ष कबूल केली नाही. कारण एक त्यांचा मुलगा होता आणि दुसरा गुलाम. दोन्ही अली (र) यांच्या स्वाधीन असल्या कारणाने त्यांची साक्ष अमान्य करण्यात आली अली (र) यांच्याकडे दुसरा कोणी साक्षीदार नव्हता म्हणून त्यांना ते चिलखत सोडून द्यावे लागले.

इस्लामी न्यायालयाचा हा निर्णय पाहून यहुदी अत्यंत प्रभावित झाला. राजप्रमुखाच्या अर्जाला ह्यासाठी रद्द करण्यात आले की त्यांच्याकडे कायदेशीररित्या कोणीही साक्षीदार नव्हता. हे सुध्दा एका मुस्लिमेवर यहुदीच्या अर्जावरून ! त्या यहुदीला ह्या न्यायानिष्ठेबद्दल आश्चर्य वाटले आणि त्याने ते चिलखत परत केले. त्या यहुदीने इस्लामी शासनाच्या न्यायनिष्ठेला पाहून इस्लामचा स्वीकार केला.

प्रश्न : १) अली कोण होते ?

२) दावा का सुरु झाला होता ?

३) अली (र) दावा का हरले होते ?

४) यहुदीच्या मनावर याचा काय परिणाम झाला ?

५) असा एखादा प्रसंग तुम्हाला माहित असेल तर सांगा ?

समता

सुलतान मुराद याने एक मशिद बनविण्याचा आदेश दिला. एक प्रसिध्द आरेखक ह्यासाठी नियुक्त केला गेला. त्याने मशिदीचा आराखडा फार सुंदर केला परंतु सुलतानला तो पसंद आला नाही. तो आरेखक फार नाराज झाला. सुलतानने रागाच्या भरात त्या आरेखकाचे दोन्ही हात कापून टाकले. तो बिचारा रडत रडत रक्ताने माखलेला न्यायालयात हजर झाला आणि सुलतान विरुध्द दावा दाखल केला.

न्यायाधिशाने सुलतानला बोलावणे पाठविले. सुलतान एक गुन्हेगार म्हणून न्यायालयात हजर झाला. तो आपल्या ह्या कृत्यावर दुःखी आणि कष्टी झाला होता. पाहणारे हैराण होते की एकीकडे आरोपीच्या पिंजऱ्यात सुलतान उभा आहे आणि दुसरीकडे आरेखक पक्षकार म्हणून उभा आहे.

सुलतानने गुन्हा कबूल केला आणि आपल्या कृत्यावर दुःख प्रकट केले.

न्यायधिशाने सांगितले की कायद्या समोर सुलतान आणि सर्व सामान्य मनुष्य दोन्ही सारखे आहेत. बादशाहाचे रक्त आरेखकच्या रक्तापेक्षावेगळे नाही. सुलतानला इस्लामी कायद्यानुसार किसास (बदला) द्यावा लागेल म्हणजे बादशाहाचे हात कापले जातील.

सुलतानने निर्णय ऐकला आणि बदला देण्यासाठी तयार झाला. त्याने आपले दोन्ही हात पुढे केले कारण त्या माणसासारखे सुलतानचे दोन्ही हात कापले जावेत. ह्या दृश्याला पाहून तो राजगीर अत्यंत प्रभावित झाला आणि म्हणू लागला.

"महोदय, मी आपणास प्रेषित (स) यांच्या सदक्यामध्ये तुम्हाला माफ केले ज्यांच्यामुळे आज आम्हाला असा समान कायदा मिळाला. इस्लामी कायद्यासमोर राजा आणि रंक सगळे समान आहेत."

मूल्यपाठ क्रमांक ४

वचनपूर्ती

उमर (र) यांच्या कारकिर्दीत मुस्लिम आणि ईराणी लोकांत घमासान युध्द झाले होते. एका युध्दात अबू उबैदा हे इस्लामी सैन्याचे सरदार होते. जाबान ईराणी दलाचा सरदार होता. नमारिक नामक स्थानावर दोन्ही सैन्यांचा मुकाबला झाला. तुंबळ युध्द झाले. ईराणी सैन्यानी जीवापाड प्रयत्न केले. परंतु मुस्लिम सैन्यासमोर त्यांचा टिकाव लागू शकला नाही. शेवटी त्यांचा पराजय झाला. अनेक ईराणी सैन्य मारले गेले आणि अनेक मैदान सोडून गेले.

मुस्लिम सैन्याने त्यांना कैद करण्यास सुरवात केली. संयोग वश एका मुस्लिम शिपायाने ईराणी सैन्याचा सरदार जाबान याला सुध्दा कैद केले. जाबान धोकेबाज आणि चालाख होता. तो म्हणाला,

"मी एक म्हतारा शिपाई आहे. तुम्ही मला कैद करून करणार तरी काय? मला तुम्ही सोडून दिले तर मी तुम्हाला मोबदला देईन."

मुस्लिम शिपाई जाबानला ओळखत नव्हता. म्हणून त्याच्या चालीमध्ये फसला आणि त्याला सोडून दिले. मुस्लिम शिपायाला हे माहित नव्हते की तो ईराणी सैन्याचा सरदार आणि एक अत्यंत उपद्रवी मनुष्य आहे.

दोन्ही अबु उबैदा यांच्या कडे गेले. तिथे लोकांनी जाबानला ओळखले. लोकांनी सांगितले की जाबानने धोका दिला आहे. म्हणून हा मामला रद्द समजावा आणि जाबानला ठार केले जावे.

परंतु मुस्लिम सरदार अबू उबैदा (र) यांनी आदेश दिला,

"आता हे अशक्य आहे. जेव्हा आमच्या एका माणसाने त्याला आश्रय दिला तर आता सर्वांना ते पाळावे लागेल आणि त्याला इज्जत द्यावी लागेल. आता सर्व मुस्लिमांसाठी जाबानचे रक्त हराम आहे. इस्लाम मध्ये वचनपूर्ती विरुध्द काहीच डावपेच नाहीत. जाबानला सोडून देण्यात आले.

प्रश्न : १) ह्या गोष्टीवरून तुम्हाला काय बोध मिळाला ?

२) जाबानला का सोडून देण्यात आले ?

३) तुमच्या नजरेत हे कृत्य कसे आहे ?

४) वचनपूर्ती कशाला म्हणतात ? इस्लामची त्या विषयी काय शिकवण आहे ?

मूल्यपाठक्रमांक ५

सत्य बोलणे

इमाम बुखारी (रह) यांचे नाव तर आपण ऐकले असेल. ते हदीसचे आणि इस्लामचे महान विद्धान होते. हदीस संकलन करण्यासाठी आपण दिलेले योगदान फार मोठे आहे. ह्यांनी संकलित केलेले हदीस संग्रह कुरआन ग्रंथानंतरचे दूसरे महत्वपूर्ण ग्रंथ मानले जाते. हदीस संकलनासाठी ते जाणीवपूर्वक व जीकरीने आणि अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असत. त्यासाठी लांबचा प्रवास सुद्धा करीत असत. जिथून कोठून माहिती मिळेल तिथे स्वत: जावून माहिती गोळा करीत असत.

एकदा एका हदीसच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी त्यांना एका हदीसच्या विद्धानाकडे जावे लागले. ते त्या विद्धानाच्या घराजवळ पोहचले. त्यांनी पाहिले की विद्धानाचा घोडा दोर तोडून पळत आहे. तो विद्धान त्या घोड्याच्या पाठीमागे धावत आहे. खाली भांडे हातात घेवून ते घोड्याला धोका देण्यासाठी त्याच्या मागे धावत होते. शेवटी घोड्याने धोका खाल्ला आणि जागेवर थाबंला. विद्धानाने त्या घोड्याला पकडून ठेवले व दोरीला बांधले.

इमाम बुखारी (रह) यांनी हे दृष्य पाहिले आणि त्वरित मागे फिरले. त्यांनी विचार केला की अशा माणसाच्या हदीस कथनाचा काय भरोसा जो मुक्या जानवराला सहज धोका देतो.

पाहिलं आपण ! इमाम बुखारी (रह) यांची हदीस संकलन कार्यासाठीची सावधगीरी आणि काळजी ! किती टोकाची होती. त्यांच्याजवळ विद्धानाचे वरील कार्य सुध्दा सत्याविरुध्द होते. स्पष्ट आहे की जो सत्य बोलणारा नाही त्याच्या बोलण्यावर विश्वास कसा ठेवता येईल ? अशा प्रकारच्या

सावधगीरीमुळे काळजीमुळे आणि प्रामाणिकपणामुळे त्यांनी संकलित केलेले हदीस ग्रंथ हे ईशग्रंथ कुरआन नंतर दुसरे प्रामाणिक आणि मौलिक ग्रंथ आहे.

प्रश्न : १) इमाम बुखारी कोण होते ? त्यांचे महान कार्य कोणते आहे ?

२) त्यांनी हदीस संकलन करण्यासाठी कोणती काळजी घेतली ?

३) विद्धानाकडे ते का गेले होते ? तेथून ते परत का फिरले ?

४) विद्धान घोड्याला कशा प्रकारे बोलवित होते ? त्यांचे हे कृत्य कशा प्रकारचे होते ?

५) सत्य कशाला म्हणतात ?

मूल्यपाठ क्रमांक ६

लोक सेवा

आदरणीय उमर (र) हे एक प्रसिध्द राज प्रमुख (खलीफा) होते. आपल्या कारकिर्दीत ते प्रजेची काळजी घेण्यासाठी रात्रीची गस्त घालीत असत. प्रजेच्या प्रश्नांची तडलावण्यासाठी ते नेहमी त्रास घेत असत.

लोकसेवेचा हाच वसा त्यांना रात्रीची झोप सुध्दा घेऊ देत नव्हता.

एका रात्री ते आपला गुलाम असलमला घेवून मदीना शहराच्या बाहेर पडले. दूर गेल्यानंतर त्यांना एक वस्ती दिसली. ते त्या वस्तीकडे गेले. जवळ गेल्यानंतर त्याना तिथे एक खेडुत उदास बसलेला दिसला. झोपडीतून रडण्याचा आवाज येत होता. माहिती करून घेतल्यानंतर कळले की त्याच्या पत्नीला मूल होणार आहे आणि ती वेदनेमुळे विव्हळत होती. त्या खेडुताकडे काहीच सामान नव्हते आणि परदेशी असल्यामुळे त्याची इतर कुणाशी ओळख सुध्दा नव्हती.

उमर (र) यांना जेव्हा सर्व स्थिती माहित झाली तर ते दु:खी झाले. ते घरी परत आले आणि आपल्या पत्नींला म्हणाले,

"अल्लाहने पुण्य कमविण्याची चांगली संधी तुला उपलब्ध करून दिली आहे. काय तुम्ही ह्या सोनेरी क्षणाचा फायदा घेणार ?"

या नंतर सर्व परिस्थिती आपल्या पत्नीला सांगितली. पत्नी ह्या सेवेसाठी आनंदाने स्वत: तयार झाली. दोघेही तयार होऊन स्वत: उमर (र) यांनी आपल्या पाठीवर पीठाचे ओझे घेतले आणि काही तेलतूप बरोबर घेतले. पत्नीने आपल्याबरोबर बाळाच्या जन्माच्या वेळी जे साहित्य लागते ते सर्व घेतले. दोघेही त्या परदेशी माणसाच्या झोपडीकडे लगभगीने गेले. पत्नी झोपडीत गेली आणि उमर (र) त्या खेडुताबरोबर बाहेर गप्पा मारत बसले.

मुस्लिम राज प्रमुखाच्या पत्नीने दायीचे काम केले. ही ईश्वरीय देन आहे. थोड्या वेळात झोपडीतून मूल रडण्याचा आवाज आला. मुलगा जन्माला आला. राणीने आतून सांगितले,

'हे राज प्रमुखा ! तुम्ही तुमच्या साथीदाराला मुलगा झाल्याची शुभवार्ता देवून टाका."

त्या खेडुताला आता माहित झाले की हे मुस्लिमांचे राज प्रमुख (खलीफा) आहेत. तो घाबरून गेला. तो उमर (र) यांची माफी मागू लागला. त्याला धीर देत उमर (र) म्हणाले,

"राजप्रमुखाचे काम आहे लोकांची सेवा करणे."

शेवटी खेडुताला जीवनावश्यक वस्तू देवून उमर (र) आणि त्यांची पत्नी तेथून परत फिरले.

मूल्यपाठ क्रमांक ७

शौर्य

औरंगजेब बादशाह विषयी तुम्हाला काही माहिती झालेली आहे. तो नेक आणि ईशपरायण बादशाह होता. शासनाचे काम मोठ्या कष्टाने करत असे. राजकोषातून स्वत:च्या खर्चासाठी एक पैसा सुध्दा घेत नसे. कुरआन ग्रंथ लेखन करून मिळालेल्या मिळकतीतून आपला उदर्निवाह चालवित असे. कधी कधी टोप्या विणकाम करून व त्या विकून आपला खर्च भागवित असे.

एका दिवसाची गोष्ट आहे औरंगजेव सकाळी सकाळीच उठला आणि फिरण्यासाठी जंगलाकडे निघाला. निसर्ग दृष्य अति लोभनिय होते. सकाळच्या आल्हाददायक हवेच्या झुळुकीने जंगलातील झाडांची पाने झूलत होती. सुंदर फूलं डोळ्याचे पारणं फेडत होती. झाडावर बसून पक्षी सकाळीच सृष्टी निर्मात्याचे गुणगाण गात होती. औरंगजेब हे दृष्य पाहून अति प्रभावित झाला. सभोवतालच्या निसर्गातील सर्व सजीवांना सृष्टी निर्मात्याचे गुणगाण करण्यात मग्न पाहून तो जागीच थांबून राहिला. कृतज्ञशीलतेने नमाजमध्ये अल्लाहपुढे नतमस्तक (सजदा) झांला.

आता तो नमाज अदा करीतच होता तेव्हढ्यात तिथे एक सिंह आला. बादशाह भक्तीमध्ये लीन होता. त्याला सिंह आल्याचे अजिबात जाणवले नाही. सिंहाने मागून येऊन बादशाहाच्या कमरेवर पंजाने वार केला. बादशाह अजिबात घाबरला नाही. त्याला अल्लाह शिवाय इतर कुणाची ही भीती नव्हती. बादशाहाने हातात तलवार घेतली आणि त्या सिहांवर वार केला. सिंह तिथेच गतप्राण झाला.

प्रश्न : १) औरंगजेब कोण होता ?
२) निसर्ग सौंदर्य पाहून औरंगजेबच्या मनात कोणता विचार झाला ?
३) कृतज्ञतेची (शुक्राना) नमाज कशी आहे ?
४) नमाज अदा करते वेळी काय घडले ?
५) सिंह कसा ठार झाला ?

मूल्यपाठ क्रमांक ८

धीर सोडू नका

फार फार दिवसांची गोष्ट आहे. स्कॉटलॅंडमध्ये एक बादशाह होऊन गेला. त्याचे नाव ब्रास होते. एकदा त्याला लढाईत हार खावी लागली. तो मैदान सोडून पळू लागला आणि शत्रूच्या नजरेतून वाचत वाचत एकांत ठिकाणी आला. तो फार निराश आणि दु:खी झाला होता. पराजयामुळे तो खचून गेला होता. पुन्हा लढण्याची त्याच्यात आता हिम्मत उरली नव्हती. निराश आणि थकलेला तो जमिनीवर पडून राहिला आणि आपल्या भविष्या विषयी विचार करू लागला. त्याचवेळी घराच्या छतावरून एक कोळी (मकडी) खाली जमिनीवर पडली. ती पुन्हा भिंतीवर चढू लागली आणि पुन्हा खाली पडली. ती आपल्या जाळ्याच्या साह्याने भिंतीवर चढण्याचा सतत प्रयत्न करत होती आणि खाली जमिनीवर पडत सुध्दा होती. त्याने अशा स्थितीत सुध्दा धीर सोडला नाही. ह्यावेळी ती जास्त वर पर्यंत चढली होती. आणि आपल्या घरट्याजवळ गेली तरी तिथून ती आणखी खाली पडली, तरी ती सतत प्रयत्नशील राहिली. अशे वाटत होते की ती निराश होणे जाणतच नव्हती. अन्तत: ती छतावर चढून जाण्यास यशस्वी झाली. कोळ्याची निरंतर प्रयत्न करण्याची जिद्द पाहून बादशाहवर अतिप्रभाव पडला. त्याने विचार केला की हा अगदी लहानसा कोळी आणि त्याची ही जिद्द! मी तर एक मनुष्य आहे आणि एकदा हरलो तर निराश होवून तोंड सोडून बसतो! माझ्या सारख्या मनुष्याला हे तर अशोभनिय कृत्य आहे. हा विचार करून त्याची हिंमत वाढली. त्याने पुन्हा प्रयत्न केला आणि मोठे लष्कर जमवून हल्ला केला आणि शत्रूवर विजय प्राप्त केला.

अशाच प्रकारे एक प्रसिद्ध गोष्ट तैमुरलंगची आहे. तो एक प्रसिध्द मोगल बादशाह होवून गेला. तो एका पायाने लंगडा होता. ह्याच मुळे लोक त्याला तैमुरलंग म्हणत असत. त्याने आपल्या शौर्याने आणि हिमतीने अनेक देशांवर

विजय मिळविला होता. एकदा एका लढाईत त्याचा पराजय झाला आणि त्याचे सर्व सैन्य विखुरले गेले. तो स्वत: जीव वाचविण्यासाठी गुहेत लपून बसला होता. ह्यां पराजयाने तो फार निराश झाला. हिम्मत बाकी राहीली नाही आणि शत्रूशी दोन हात करण्याची ताकद त्याच्यात राहीली नाही. निराश होवून पडून राहिला असता अचानक त्याची नजर एका मुंगीवर पडली. ती तोंडात एक दाणा घेवून वर चढत होती. दाणा मोठा होता. मुंगीला तो दाणा फार जड झाला होता. परंतु अल्लाहने मुंगीमध्ये अशी हिम्मत ठेवली आहे की ती आपल्या कुव्वती पेक्षा जास्त ओझे वाहण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक वेळी ती वर चढण्याचा प्रयत्न करायची आणि खाली पडायची. परंतु ती सतत प्रयत्न करत राहीली. शेवटी तो दाणा घेवून ती वर चढण्यात यशस्वी झाली.

ह्या घटनेकडे पाहून तैमूर अति प्रभावित झाला. त्याने विचार केला की "अल्लाहने निर्माण केलेली ही लहानशी मुंगी तर दृढ निश्चयाची आहे. ती सतत पराजित होवून सुध्दा तिने हिम्मत सोडली नाही. आणि मी मात्र सर्वश्रेष्ठ जीव असून एका पराजयाने निराश होवून बसलो आहे." हा विचार मनात आल्यानंतर तो हिम्मत बांधून पुन्हा उठला. लष्कराला पुन्हा तयार केले आणि पूर्ण ताकदीने शत्रूशी सामना दिला. तो आता विजयी झाला होता.

प्रश्न : १) ब्रास कोन होता ?

२) पराजित झाल्यावर त्याची मानसिक स्थिती कशी झाली ?

३) त्याने काय पाहील्यानंतर धीर उत्पन्न झाला ?

४) तैमूरलंग कोण होता ?

५) तो निराश का झाला ?

६) त्याला पुन्हा हिम्मत कशी आली ?

७) शेवटी काय झाले ?

मूल्यपाठक्रमांक ९

जबाबदारीची जाणीव

सत्यनिष्ठ चारही राज प्रमुख (खलीफा) आपापल्या जबाबदारींना ओळखून होते. म्हणूनच त्यांच्या कारकिर्दीत शासन व्यवस्था अल्लाह आणि प्रेषित (स) यांच्या आदेशाप्रमाणेच होती. परंतु नंतरचे लोक आपल्या जबाबदारीला विसरून बसले. यांनी सुध्दा दुसऱ्या बादशाहांसारखे वर्तन अंगिकारले होते. राजकोषाला जनतेची अमानत म्हणजे जनतेचा पैसा समजण्या ऐवजी स्वत:ची संपत्ती समजून बसले आणि ऐशआरामासाठी खर्च करण्यास सुरुवात केली. राज प्रमुख पद आणि शासन आपल्या परिवारासाठीच समजून इतरांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले. मोठमोठी शासकिय पदे आपल्या सम्यासोयऱ्यांना देण्यात येऊ लागली. प्रजेवर अत्याचार होऊ लागला. लोकांच्या हक्कांवर डाका टाकला जाऊ लागला.

ह्याच परिस्थितीत माननीय उमर बीन अब्दुल अजीज (र) राजप्रमुख बनले. ते नेक वृत्तीचे आणि ईशपरायण गृहस्थ होते. त्यांनी अतोनात प्रयत्न केले की शासन व्यवस्था ही आदर्श खलीफा प्रमाणे चालावी. त्यांना ह्या प्रयत्नात बरेच यश आले. म्हणून अनेक लोक उमर बीन अब्दूल अजीज (र) यांची गणना ह्या आदर्श खलीफाशी करतात.

सुलेमान बीन अब्दुल मलिक नंतर हे खलीफा झाले. सुलेमान खलीफाच्या कफन दफन विधीमधे पूर्ण दिवस गेला. रात्री मुस्लिमांशी साक्ष घेण्यात गेली. चोवीस तास काम करून आणि रात्रभर जागरण केल्यामुळे त्यांची तब्येत बिघडली. दुसऱ्या दिवशी फरज (सकाळ) नमाजनंतर आराम करण्याचा विचार मनात आला तेव्हढ्यात त्यांचे पुत्र तिथे आले. त्यानी विचारले, "आब्बाजान ! आपला काय विचार आहे?"

"तब्येत बिघडली आहे. रात्रभर जागरण झाले आहे. थोडा आराम करण्याचा विचार आहे." खलीफा म्हणाले, पुत्र म्हणाला, "समस्त जनता आपणास पाहण्यास इच्छूक आहे आणि आपण आराम करत आहात ? किती जण अत्याचार पीडित आहेत. कित्तेकांचे हक्क मारले गेले आहेत. सर्वांना वाटते की तुम्ही त्यांना न्याय द्याल. त्यांना अत्याचारी लोकांच्या पकडीतून मुक्त कराल. ज्यांचे हक्क मारले गेले आहे, त्यांना त्यांचा हक्क परत मिळवून द्याल त्या सर्वांना न्याय न देता तुम्ही आराम कसा करू शकता?"

"बेटा ! रात्रभर जागरण असल्याने मी आराम करतो आणि जोहर नमाजनंतर (दुपारी) सर्वांचे मी गाऱ्हाणे ऐकून घेईल आणि कार्यवाही करील." खलीफा म्हणाले.

"अब्बाजान ! काय आपण अस्वस्थ आहात की आपणास ह्या दरम्यान मृत्यू येणार नाही ? जर आपण कायमचेच झोपी गेलात तर ह्या जबाबदारीसाठी आपण अंतिम दिनी काय उत्तर द्याल?" पुत्र म्हणाला. खलीफांनी पुत्राचे हे बोलणे ऐकल्यावर त्याला आपल्या छातीशी लावले आणि आपला आराम सोडून ते प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी बाहेर पडले.

प्रश्न : १) माननीय उमर बीन अब्दूल अजीज कोण होते ? ते कोणत्या स्थितीत राजप्रमुख झाले ?

२) त्यांनी शासन व्यवस्था कशा प्रकारे चालवली होती ?

३) त्यांना शासन प्रमुखाचे पद कसे मिळाले ?

४) ते आराम करण्यासाठी का जात होते ?

५) आपल्या पुत्राशी त्यांचे काय बोलणे झाले ?

६) तुम्ही ह्या गोष्टी मुळे काय बोध घेतला ?

कर्ज माफ करणे

सिकंदर लोदी हिंदुस्थानचा मोठा बादशाह होऊन गेला. तो नेक आणि सदाचारी होता. तो प्रौढ लोकांचा फार आदर करीत असे. त्याच्याच कारकिर्दीत जैनुद्दीन नावाचे एक थोर संत होऊन गेले. ते श्रीमंत गृहस्थ होते. आपली दानशूरता, सदाचार वृत्ती आणि ईशपरायणता पाहून सुलतान त्यांना इज्जत देत होता. ते दैनंदिन कामे अति नियमितपणे पार पाडीत असत.

एकदाची गोष्ट आहे. शुक्रवारचा दिवस होता. त्यांना बोलविण्यासाठी बादशाहाने लागोपाठ तीनदा शिपायी पाठविला. परंतु आपण आपल्या कामाला सोडून बादशाहाच्या दरबारात गेले नाहीत. दरबारी लोकांनी बादशाहाला भडकावून देण्याचे काम केले. ते म्हणू लागले "बादशाहाने स्वतः तीनदा बोलावणे पाठविले तरी जैनुद्दीन आले नाहीत."

"मला आठवण राहिली नाही. शुक्रवारी ते ठरल्याप्रमाणे बाहेर पडत नाहीत. त्यांना वेळ मिळाल्यास ते कधी तरी येऊन जातील." बादशाहाने दरबारींना सांगितले.

बादशाहाच्या मृत्यूनंतर जैनुद्दीन यांना पदावरून हटविण्यात आले. त्यांची संपत्ती संपून गेली होती. ते गरीब बनले तरी दानशुरता आणि दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती त्यांची गेली नाही.

एकदा त्यांनी आपल्याकडील बरीच कागद पत्रें फाडून टाकली. आणि नोकरांना बजावले की ह्या फाटलेल्या कागदांना अशा प्रकारे धुवून टाका की त्यांच्यावर लिहीलेले काहीही शिल्लक राहू नये. नोकर कागदं धूत असतांना दुसऱ्याने विचारले की "ही फाटलेली कागदं तू का धुवून घेत आहेस?"

श्रीमंतीच्या काळात फार लोकांनी माझ्याकडून पैसे उधार घेतलेले होते. त्यांना पैसे देते वेळी ते पैसे त्यांच्या पासून परत घेण्याची माझी इच्छा नव्हती. परंतु त्या लोकांनी तरीही कागदपत्रे नोंद करून पाठविली. ही तीच कागदपत्रे आहेत. त्या सर्वांना ह्यासाठी नष्ट केले की माझ्या गरीबींमुळे त्यांच्या कडून पैसे परत मागण्याचा मोह होऊ नये. आणि मी मेल्यानंतर माझे वारसदार त्या लोकांकडून पैसे वसूली करू नये."जैनुद्दीन यांनी मित्राला स्पष्ट सांगितले.

उधारीची ही रकम तीन लाखापर्यंत होती. परंतु ह्या महान संत पुरुषाने आपल्या हालाखीच्या आणि गरीबीच्या स्थितीत सुध्दा दिलेले कर्ज परत घेतले नाही तर कर्ज परत फेडीचा मार्ग सुध्दा बंद केला.

साधी राहणी

डॉक्टर इक्बाल हिंदुस्थानातील प्रसिध्द कवी होते. ते अत्यंत साधे जीवन जगत होते. ते लंडन वरून बॅरिस्टर व डॉक्टरची डीग्री प्राप्त करून आले होते आणि सरकारतर्फे त्यांना 'सर' ही उपाधि प्राप्त झाली होती. तरी त्यांची अत्यंत साधी राहाणी होती.

एकादाची गोष्ट आहे. पंजाबच्या एका श्रीमंताने कायद्याचा सल्ला घेण्यासाठी डॉ. इक्बाल आणि दुसऱ्या इतर वकीलांना आपल्या घरी बोलाविले. आपल्या आलिशान घरात सर्वांच्या राहाण्याची व्यवस्था केली. रात्री जेव्हा डॉ. इक्बाल आपल्या खोलीत आराम करण्यासाठी गेले तर चहुकडे ऐशआरामाच्या वस्तू पाहून आणि अत्यंत आरामदायक शयनगृह पाहुन ते विचारात पडले. त्यांनी विचार केला की ज्या प्रेषित (स) यांच्या पायाच्या धुलीकणांमुळे आज आम्हाला ही इज्जत व आदर मिळाला त्यांनी तर बारदानावर झोपूनच आपले जीवन जगले. आणि आम्ही ऐश करावी ? त्यांच्या मनात हा विचार येताच त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्या ऐश आरामात आणि आरामदायक शयनगृहात झोपणे त्यांना असह्य झाले.

शेवटी डॉ. इक्बाल तेथून बाहेर पडले आणि जवळच्याच न्हानी घरात एका खुर्चीवर जावून सारखे रडत बसले. जेव्हा मनाला धीर मिळाला तर त्यांनी आपल्या नोकराला बोलावून घेतले आणि आपले अंथरूण उघडून घेतले. इक्बाल यांनी ते अंथरून चारपाईवर अंथरले आणि न्हानी घरातच त्या चारपायीवर झोपले.

मूल्यपाठ क्रमांक १२

ज्ञानाची कदर

हारून रशिद थोर मुस्लिम बादशाह होवून गेले. बगदाद त्यांची राजधानी होती. एकदा ते मदिना शहराला भेट देण्यासाठी गेले. त्यांची दोन्ही मुलं मामून आणि अमीन त्यांच्या बरोबर होती.

मदिना शहरात एक प्रसिध्द मदरसा चालत असे. तो मदरसा (पाठशाळा) नबवी मशिदीत होता. ईमाम मालिक (र) तिथे शिक्षकाचे कार्य पार पाडत होते. ते विद्धान गृहस्थ होते. हदीस पाठ ते सोप्या भाषेत आणि प्रभावीपणे देत असत. दूरून लोक त्यांच्याकडे हदीस पाठ घेण्यासाठी येत असत आणि त्यांच्या जवळ राहून ज्ञान प्राप्त करत असत.

हारून रशीद यानी सुध्दा ह्या मदरशा विषयी ऐकले होते. ते ज्ञानाची कदर करत होते. त्यांनी विचार केला की माझी दोन्ही मुलं ईमाम मालिक जवळ राहून ज्ञान संपादन करतील तर बरे होईल. ते राजपुत्रांना मदरशा मध्ये पाठवू इच्छित नव्हते. त्यांनी ईमाम साहेबांना बोलावणे पाठविले आणि सांगितले की माझी मनोकामना आहे की माझ्या दोन्ही मुलांनी तुमच्याकडे ज्ञान संपादन करावे परंतु राजपुत्रांना मदरशामध्ये पाठविणे माझ्या शान विरुध्द आहे.तुम्ही स्वत: राजमहालात येऊन मुलांना शिकविले तर फार बरे होईल.

ईमाम मलीक ज्ञानाचा हा अपमान सहन करू शकत नव्हते. ज्याला ज्ञान प्राप्त करावयाचे आहे तो स्वत: ज्ञानाकडे येतो. तहाणलेल्याकडे विहीर जात नाही. म्हणून ईमाम साहेबानी सांगितले, "हे बादशाह ! हे ज्ञान आपल्याच घरातून आले आहे तुम्ही जर ज्ञानाचा अपमान करू इच्छित असाल तर खुशाल करावे."

हे उत्तर प्राप्त करून हारून रशीदने आपले उत्तर पाठविले, "आपण जर येथे येणे योग्य समजत नसाल तर आमीन व मामून मदरशात येतील परंतु त्यांना शिकवितांना दुसरी मुलं तिथे हजर असू नयेत." ईमाम साहेबांनी उत्तर दिले, "मला दु:ख होत आहे की मी आपल्या ह्या आदेशाचे सुध्दा पालन करू शकत नाही. इस्लामची शिकवण तर बरोबरीची आणि समानतेची आहे. नबवी मशिदीत बसून विद्यार्थ्यां मधील हा भेदाभेद मी सहन करू शकतच नाही.

ईमाम मलीक साहेबांच्या ह्या सडेतोड उत्तराने हारून रशीद फार प्रभावित झाले. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना त्यांच्याकडे ज्ञानार्जन करण्यासाठी पाठवून दिले. बराच काळ दोन्ही मुलं मदरशात दुसऱ्या मुलांबरोबर ज्ञानार्जन करीत होती.

परीक्षा

सिंकदर एक सम्राट होवून गेला. त्याला जग जिंकण्याची आवड होती. त्याला वाटे की साऱ्या जगावर त्याला ताबा मिळावा. ह्यासाठी त्याने मोठमोठे युध्द केले आणि अनेक राज्यांचा विनाश केला. अति दूर राहणारा परंतु हिंदुस्थानवर स्वत:चे शासन चालावे असे त्याला वाटत होते. त्याने ह्या देशावर सुध्दा स्वारी केली. परंतु त्याच्या सैन्याने पुढे जाण्यास नकार दिला. म्हणून नाविलाजाने तो माघारी फिरला. परत जात असतानांच बाबिल शहरानजिक त्याला मृत्यू आला. सम्राट सिकंदर प्रेषित ईसा (अ) यांच्या तीनशे वर्ष पूर्वी होऊन गेला.

त्याच्या शासन काळात एक देब जॉन्सकल्बी नावाचा म्हातारा होता. तो डोगंरावर झोपडी बांधून राहात होता. सिकंदरने सुध्दा ह्या वयस्कर माणसाच्या विषयी ऐकले होते. सिकंदर त्या म्हाताऱ्या माणसाकडे स्वत: गेला. थंडीचे दिवस होते. तो गृहस्थ आपल्या झोपडी समोर उन्हात बसलेला होता. सिकंदर त्याच्या जवळ गेला आणि सलाम केला. त्या दिशेने तो उभा राहिला ज्या बाजूने उन्ह येत होते.

देब जान्स ने ह्याची पर्वा न करता तिकडे लक्ष सुध्दा दिले नाही. की सम्राट सिकंदर जवळ आहे. तो वृध्द गृहस्थ आपल्या उपासनेत मग्न होता. सिकंदरने विचार केला की ह्या वृध्दाला जंगलात खाण्यापिण्याला काहीच भेटत नसेल. त्याला काही तरी द्यायला पाहिजे. म्हणून सिकंदर म्हणाला, "महाशय तुम्हाला तर येथे फारच त्रास होत असेल. तुम्हाला काही मी देऊ इच्छितो."

देबजान्स चांगल्या प्रकारे जाणून होता की सिकंदरने आपल्या साम्राज्याला वाढविण्यासाठी अनेक देश हडप केले. आणि दुसऱ्यांच्या शांती समृध्दीवर डाके टाकले. जो इतका लालची आहे तो दुसऱ्यांची काय मदत करणार ? म्हणून कडक शब्दात उत्तर दिले.

"जरा दूर व्हा ! मला उन खाऊ द्या. तुम्ही येथे येऊन माझं उन हिसकावून घेतले. मला तुमच्या कडून काहीही नको. मला माझ्या अल्लाहने जी वस्तू दिली आहे ती तर वापरू द्या."

वृध्दाच्या ह्या उत्तराने सिकंदर फार प्रभावित झाला. त्याला कळून चुकले की जगात अत्याचार आणि उपद्रव ह्याच कारणाने आहे. अल्लाहच्या दिलेल्या वस्तूंवर मनुष्य समाधानी राहात नाही. तो लोभ लालसेच्या आहारी जाऊन दुसऱ्यांचे हक्क मारतो.

प्रश्न : १) सिकंदर कोण होता ? तो देब जॉन्सजवळ का गेला ?

२) त्याने देबजॉन्सला काय सांगितले ? देब जॉन्सने काय उत्तर दिले ?

३) सिकंदर वर देबजॉन्सच्या उत्तरांचा कसा प्रभाव पडला ?

४) जगातील अशांतीचे कारण काय आहे ?

मूल्यपाठ क्रमांक १४

त्यागाचे उत्कृष्ठ उदाहरण

माननीय अबू बकर (र) यांच्या कारकिर्दीत रोमन साम्राज्याशी यरमूक ह्या ठिकाणी घमासान युध्द झाले होते. ह्या लढाईत रोमन सैनिक मुस्लिम सैन्यांपेक्षा किती तरी अधिक संख्येने होते. माननीय खालीद (र) यांच्या सारखे शूर सेनापतिं यांच्या सावधगिरीने आणि अल्लाहच्या मदतीने मुस्लिम सैन्याने रोमन सैन्यांची पीछेहाट केली. ते सैरावैरा पळू लागले. ह्या युध्दात सुमारे सव्वालाख रोमन सैन्य मारले गेले होते. तीन हजार मुस्लिम शिपायी सुध्दा शहीद झाले. ह्याच युध्दातील घटना आहे. एक मुस्लिम शिपायी आपल्या चुलत भावाला शोधत होता. भाऊ युध्दात सामील होता. त्यांनी घडा भरून पाणी बरोबर घेतले आणि भावाचा शोध घेऊ लागले. भाऊ तहाणलेला असेल तर त्याला त्वरित पाणी पाजावे. अशी त्यांची इच्छा होती. मैदानात अनेक मृत देह पडलेले होते. त्या मध्ये त्यांना आपला भाऊ गंभीर जखमी होऊन पडलेला दिसला. तो अत्यवस्थ स्थितीत होता. भावाला पाणी पाजण्यासाठी गाडगं भावाच्या तोंडाला लावणार तोच दुसऱ्या शिपायाचे विव्हळणे कानावर पडले. शेजारील शिपाई सुध्दा मरणास्थ होता. जखमी चुलत भावाने सांगितले, “प्रथम त्यांना पाणी पाजा.”

गाडगं घेवून ते शेजारच्या शिपायाकडे गेले. ते सुहेल (र) होते. ते त्यांना पाणी पाजणारच तेव्हढ्यात शेजारील तिसऱ्या माणसाच्या विव्हळण्याचा आवाज आला. सुहेल (र) यांनी सांगितले,

“प्रथम त्यांना पाणी पाजा.”

तो मुस्लिम शिपायी त्या तिसऱ्या माणसाजवळ गेला पाहिले तर ते हारीस (र) होते. जे जबर जखमी होऊन व अत्यवस्थ होऊन पडलेले होते. पाणी घेऊन त्यांच्यापर्यंत ते पोहचतात तो पर्यंत हारिस (स) गतप्राण झाले. तेथून त्वरित परत फिरून सुहेल (र) यांच्याकडे धाव घेतली. त्या ठिकाणी जाताच काय पाहता की सुहेल (र) यांनी सुध्दा प्राण सोडला होता.त्वरित चुलत भावाकडे धाव घेतली परंतु चुलत भाऊ सुध्दा गतप्राण झाला होता.

अशा प्रकारे ह्या तिन्ही जखमी शूर वीरांनी तहाणेने आपले प्राण गमाविले. परंतु आपल्या दुसऱ्या जखमी भावाच्या अगोदर स्वत: पाणी पिणे योग्य समजले नाही.

प्रश्न : १) त्याग कशाला म्हणतात ?

२) या सहाबा (साथीदार) यांच्या त्यागा बद्दल तुमचे काय मत आहे ?

३) त्यागाबद्दल तुम्ही आणखी कुठे ऐकले आहे का ?

सदाचाराची ओढ

माननीय अबू बकर (र) यांच्या कारकिर्दीतील ही घटना आहे. मदीना शहरा लगत एका आंधळ्या म्हाताऱ्याची झोपडी होती. म्हातारी अत्यंत अशक्त आणि असहाय होती. तिच्या घरात कोणी नव्हते. ह्या म्हातारपणात तिला आधार कुणाचाच नव्हता. ती वाझंट होती. उमर (र) यांना ह्या म्हातारी विषयी कळले. ते तर अशा संधीची वाटच पाहून असत. त्यांनी ह्या असहाय म्हातारीची सेवा करण्याचे ठरविले. ते नेहमी त्या म्हातारीच्या घरी सकाळीच जात असत. तिच्या झोपडीत साफसफाई करत, पाणी भरत आणि तिला बाजारातून जी वस्तू नसेल ती आणून देत असत.

उमर (र) सर्व प्रकारची सेवा त्या म्हातारीची करीत होते. आणि तिला आराम मिळावा ह्याची काळजी घेत होते. म्हातारी आंधळी असल्याने तिला माहित झाले नाही की हे सर्व काम कोण करत आहे. माननीय उमर (र) तर त्या म्हातारीची सेवा आपले मरणोत्तर जीवन बनविण्यासाठी आणि अल्लाहला खुश करण्यासाठी करत होते. कुण्या इतरांना दाखविण्यासाठी अथवा आपली प्रसिध्दी होण्यासाठी करत नव्हते. ह्याच मुळे ते अगदी पहाटे अंधारात त्या म्हातारीकडे दररोज जात असत जेणेकरून इतरांना कळू नये.

फार दिवसापर्यंत असेच चालत राहिले. काही दिवसानंतर त्यांना कळले की त्यांच्या अगोदर दुसराच कोणी तरी म्हातारीचे सर्वकाम करून जातो. उमर (र) यांना काळजी वाटू लागली की हे कोण गृहस्थ आहे ? तो तर माझ्या अगोदर येथे पोहचतो आणि म्हातारीची सेवा करून जातो !

म्हातारी आंधळी असल्याने तिला काय माहित की कोण येतो ? तिला तर काम होण्याशी मतलब ! दुसरा मनुष्य म्हातारी झोपेत असतांनाच सर्व काम करून जात होता. म्हणून माननीय उमर (र) यांनी एका रात्री स्वतः म्हातारीच्या झोपडीच्या दाराआड लपून राहिले. भल्या पहाटे एक जण म्हातारीच्या झोपडीत आला आणि हळूच सर्व कामे करू लागला. उमर (र) यांनी ओळखण्याचा प्रयत्न

केला. परंतु अंधार असल्याने ओळखू शकले नाहीत. जेव्हा ते सर्व काम आटपून निघण्यासाठी दरवाज्यात आले तेव्हा त्या व्यक्तीला ओळखून उमर (र) दंग झाले. ते तर मुस्लिमांचे राजप्रमुख (खलिफा) माननीय अबू बकर (र) होते !

ह्याच प्रकारची आणखी एक घटना आहे. तबुकच्या युद्धाच्या वेळी जेव्हा मुस्लिम तंगीत आणि त्रस्त होते आणि जगातील सर्वश्रेष्ठ आणि शक्ती मान सैन्याशी मुस्लिमांना टक्कर द्यावयाची होती. त्यावेळी प्रेषित (स) यांनी जिहादसाठी द्रव्य रूपात मदत करण्याचे सर्वांना आवाहन केले. त्याकाळी माननीय उमर (र) यांच्याकडे बरीच संपत्ती होती. त्यांनी विचार केला की अशा स्थितीत मी माननीय अबू बकर (र) यांच्यावर आता बाजी मारून नेणार. हे नक्कीच ! म्हणून आनंदाने घरी गेले आणि पूर्ण संपत्तीचा अर्धा हिस्सा घेवून प्रेषित (स) यांच्या सेवेत हजर झाले. आदरणीय प्रेषित (स) यांनी विचारले.

"उमर ! घरांतील लोकांचा सुध्दा हक्क आहे. मुलांबाळासाठी काही बाकी ठेवले की नाही ? काय सगळी संपत्ती घेवून तर आला नाहीस ना ?

"महाशय अर्धी संपत्ती मुलाबाळांसाठी शिल्लक ठेवली आहे." माननीय उमर (र) म्हणाले.

तेव्हढ्यात माननीय अबू बकर (र) घरातील सर्व सामान घेवून तिथे आले आणि प्रेषित (स) यांच्या चरणी आणून ठेवले. प्रेषित (स) यांनी विचारले, "अबू बकर (र) घरच्या लोकांची काळजी घेतली की नाही? त्यांच्यासाठी काय शिल्लक ठेवले ? "त्यांच्या साठी तर फक्त अल्लाह आणि त्याचे प्रेषित (स) यांचे प्रेम पुष्कळ आहे." अबु बकर (र) म्हणाले.

माननीय उमर (र) तिथेच उभे होते. ते स्वत:ला रोखू शकले नाहीत आणि म्हणाले,

"मी कधीही माननीय अबु बकर (र) यांच्यापुढे जाऊच शकत नाही."

मूल्यपाठ क्रमांक १६

हिसांचाराचा तिटकारा

माननीय उस्मान (र) यांच्या कारकिर्दीतील शेवटचे दिवस होते. काही लोकांनी त्यांच्याशी विनाकारण गैरसमजूती करून घेतल्या होत्या. बसरा, कूफा आणि इजिप्तच्या काही विद्रोही लोकांनी मदिना शहरात येऊन उस्मान (र) यांच्या घराला घेराव केला आणि त्यांना शहीद करण्याचे ठरविले. त्यांनी आपली बाजू त्या लोकांसमोर मांडली. आपले कार्य त्यांच्या पुढे ठेवले. विद्रोहींनी त्यांच्या सेवेला मान्य केले परंतु त्यांनी आपला विचार बदलला नाही. लोकांनी घरावर दगड मारण्यास सुरवात केली. उस्मान (र) आपल्या घरात येऊन बसले.

घेरावच्या काळात घरात ते सतत उपवास ठेवत असत. ईफ्तार (रोजा सोडणे) च्या वेळी कधी कधी पाणी सुध्दा मिळत नसे. तर जेवण बाजूलाच ! ह्याच स्थितीत रात्र निघून जात आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा रोजा ठेवत असत. दगड मार चालू असल्याने घरात ते बंद होते. जेवण खावण मिळत नव्हते. म्हातारपण आणि त्यात उन्हाळ्याच्या दिवसात अशा स्थितीत सततचे रोजे ठेवणे! विचार करा त्या काळातील राजप्रमुखाची ही स्थिती काय असेल ?

उस्मान (र) यांच्या समर्थकांची संख्या सुध्दा जास्त होती. प्रेषित (स) यांच्या घराण्यातील संबंध होते. ते अनाथ, गरीब, विधवा आणि असहाय लोकांची मदत करण्यात सर्वात पुढे होते. ते स्वत: उत्कृष्ठ प्रतीचे सदाचारी होती. ते प्रेषित (स.) यांच्याशी संबंधीत नाते असल्याने आणि राजप्रमुख असल्याने, त्यांच्या लाखो समर्थकांनी विद्रोहींना नष्ट करण्याचा आग्रह धरला. ते दयाशील होते. सशस्त्र लढ्यासाठी तयार झाले नाही. आपल्यासाठी मुस्लिमांमध्ये हिसांचार माजावा त्यांना अमान्य होते. पाचशे शूर गुलाम हल्ला करण्यास तयार होते. त्यांनी फार आग्रह केला परंतु उस्मान (र) यांनी परवानगी दिली नाही. त्या शूर गुलामांना आझाद केले आणि आदेश दिला, "तुम्हाला जिथे वाटेल तिथे जा, परंतु मुस्लिमांशी लढू नका."

ह्याच वेळी माननीय मुगीरा (र) सेवेत हजर झाले. त्यांनी आपला

विचार प्रकट केला की आपण ह्या विद्रोहीशी एक तर लढावे किंवा घराची मागील भिंत पाडून मक्केकडे कूच करावे. किंवा इजिप्त कडे निघून जावे. परंतु माननीय उस्मान (र) यांनी संयम दाखवून उत्तर दिले.

"मी लढाई साठी तयार नाही. मला हे अमान्य आहे की प्रेषित (स) यांचा संबंधित असून सुध्दा मुस्लिमांमध्ये हिंसाचाराचे कारण मी बनावे. मक्का शहराकडे मी ह्यासाठी जाऊ शकत नाही की हे विद्रोही काबागृहात उपद्रव माजवू नयेत. काबागृहात लढाई व हिंसा करणे त्या पवित्र जागेचा अपमान आहे. तसेच प्रेषित (स) यांचा शेजार सोडून मी इजिप्तला सुध्दा जाऊ शकत नाही.

माननीय अली (र) यांना जेव्हा कळले की विद्रोही उस्मान (र) यांना ठार करू इच्छितात. त्यांनी आपल्या दोन लहान मुलांना (हसन आणि हुसेन (र)) यांना काही लोकांसमेवत त्यांच्या रक्षणार्थ तैनात ठेवले. परंतु त्या विद्रोही लोकांनी घराची मागील भिंत तोडून घरात प्रवेश केला. माननीय उस्मान (र) कुरआन पठण करीत असतानांच विद्रोहींना त्यांना शहीद केले.

"इन्ना लिल्लाहि व इन्ना इलैहि राजिऊन"

(आम्ही सर्व अल्लाहची निर्मिती आहोत आणि आम्हाला त्याच्याकडेच परत जावयाचे आहे)

माननीय उस्मान (र) यानी जीव देणे पसंत केले. परंतु आपल्या जीवनात मुस्लिमांमध्ये फूट पडू दिली नाही की हिसांचार होऊ दिला नाही. अल्लाह आपल्याशी प्रसन्न होवो !

प्रश्न :
१) माननीय उस्मान (र) कोण होते ?
२) त्यांचे कोण कोणते गुणवैशिष्ट्यें होते ?
३) विद्रोहींना त्यांनी कसे समजून सांगितले ?
४) विद्रोहींनी त्यांचे म्हणणे ऐकले ?
५) घेरावच्या काळात आपण काय करत होता ?
६) त्यांच्या हितचिंतकांनी कोणता सल्ला दिला ? त्यांनी काय उत्तर दिले ?
७) ह्या घटनेमुळे उस्मान (र) यांचे कोणते गुण दिसून येते ?

विद्यार्थ्यांकडून आपले काम शिक्षकांनी करून घेणे अयोग्य

शिष्यांचे आध्यात्मिक बाप गुरु असतात. त्यांचे उपकार आईवडिलांपेक्षा काही कमी नसतात. म्हणूनच शिष्य नेहमीच आपल्या चांगल्या गुरूंचा आदर सम्मान आणि आज्ञा पाळत असतो. तो त्यांची सेवा अशा प्रकारे करतो जशी आईवडिलांची सेवा केली जाते. परंतु ह्याचा अर्थ असा मुळीच नाही की गुरूने त्यांच्या कडून आपली घरगुती किंवा खाजगी कामे करून घ्यावीत आणि शिक्षणाच्या पवित्र हेतुला बाधा आणावी. अशामुळे शिक्षण एक पवित्र कर्तव्य ठरण्याऐवजी एक व्यवहार बनून राहाते. शिक्षक आपल्या अध्यापनाचा आणि ज्ञानदानाचा मोबदला परलोकात अल्लाहपाशी घेण्याऐवजी जगातच शिष्यांची सेवा घेऊन प्राप्त करतो. अशा स्थितीत ह्या पवित्र कार्यात नैतिकता शिल्लक राहात नाही. चांगल्या गुरुचे हे वैशिष्टय आहे की त्यांनी स्वत: त्याग केला परंतु शिष्या कडून त्याचा मोबदला कधीही घेतला नाही.

अब्दुल्लाह बदायुनी हे शिक्षक शिकवण्या व्यतिरिक्त आपले घरगुती काम स्वत: करायचे. घरातील आवश्यक वस्तु बाजारात जाऊन स्वत: खरेदी करत असत व ते ओझे स्वत: आणत असत. अशा स्थितीत सुध्दा ते आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञानर्जन करत असत. कधी कधी तर ते रस्त्याने पायी चालत असताना विद्यार्थी सुध्दा त्यांच्या बरोबरीने चालत असत आणि अध्ययन कार्य चालत असे. अब्दुल्लाह बदायुनींच्या हातातील ओझे आपल्याजवळ घेण्यासाठी विद्यार्थी आतुर असत परंतु ते असे करण्यास तयार होत नसत. पाठीवर कधी कधी ओझे असायचे रस्त्याने पायी चालायचे आणि चालता चालता

शिकवण्याचे कार्य सुध्दा पार पाडले जात होते. त्यांनी कधीही विद्यार्थ्यां कडून आपले काम करून घेतले नाही.

मौलाना कारी अब्दुर्रहमान साहब (रह) पानिपत येथे ज्ञानदानाचे काम करीत होते. ते अशाच प्रकारचे शिक्षक होते. मौलाना हादी (रह) त्यांचे शिष्य होते. एकदा त्यांनी पत्र लिहिले. ते पत्र नोकरा करवी पोस्टात टाकण्यासाठी नोकराची येण्याची वाट पहात होते. ह्या विषयी त्यांच्या शिष्याला कळाले की शिक्षकाला त्यांचे पत्र पोस्टात टाकायचे आहे. विद्यार्थी शिक्षकाजवळ आला आणि म्हणाला,

"आणा मी पत्र पोस्टाच्या पेटीत टाकून येतो." त्याने ह्यासाठी आग्रह धरला तेव्हा शिक्षक म्हणाले "मी तुमच्या कडून हे काम करून घेऊ इच्छित नाही. कारण तुमचा माझ्याशी संबंध शिक्षणामुळे आला. तुम्ही हे पत्र शिक्षकाचे हक्क म्हणून कराल परंतु माझ्या नजरेत हे कृत्य सुध्दा लाचखोरी आहे. ह्यामुळे शिक्षणाचे पावित्र्य नाहीशे होईल. म्हणून हे शुल्लक कार्य मी तुझ्याकडून करून घेऊन माझे पुण्य का वाया घालू?

पहा ! ह्या आदरणीय शिक्षकांचे आचरण अल्लाह ! ह्या शिक्षकांना चांगला मोबदला देवो !

ह्या आदर्श शिक्षकांनी आम्हा सर्वांपुढे एक आदर्श घालून दिला आहे.

प्रश्न : १) अब्दुल्लाह बदायुनी यांच्या विषयी तुम्हाला काय माहित आहे ?

२) ते बाजार स्वत: का करीत असत !

३) मौलाना अब्दुर्रहमान कोण होते ?

४) पत्र लिहिल्या नंतर त्यांनी काय केले ?

५) विद्यार्थ्यांशी त्यांचा काय वार्तालाप झाला ?

६) विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळे ते त्याला काय म्हणाले ?

प्रेषित (स) यांच्याशी प्रेम

मुस्लिम आणि ख्रिस्ती यांच्यात फार काळापर्यंत युध्द होत राहिले. एकदा ख्रिस्ती लोकांनी प्रेषित (स) यांच्या पवित्र शवाची विटंबना करण्याचे ठरविले. ह्या कामासाठी दोन माणसं नियुक्त केली गेली. हे दोन्ही जॉर्डन कडून येणाऱ्या हाजी लोकांच्या काफिल्यात हाजी लोकांचा पोशाखात सामील झाले. ह्या लोकांनी आदरणीय प्रेषित (स) यांच्या कबरीजवळच्या एका घरावर ताबा मिळविला. आणि ते दोघे तिथेच राहू लागले. दिसायला हे दोघे अति पुण्यशील व ईशपरायण वाटायचे. मदिना शहरातील लोक त्यांच्यावर विश्वास ठेवू लागले.

मदिनावासी लोकांचा विश्वास संपादन केल्यानंतर ते आपला डाव टाकू लागले. त्यांनी राहात्या घरातून प्रेषित (स) यांच्या कबरीच्या दिशेने बोगदा खोदण्यास सुरवात केली. जवळच एक खड्डा होता. बोगद्यातून निघालेली माती त्या खड्यात भरली जात आणि रात्री मैदानात पसरून टाकत.

फार दिवसापर्यंत त्यांचे हे काम गुप्तपणे चालत राहिले. आता ते बोगदा खोदीत खोदीत प्रेषित (स) यांच्या कबरीपर्यंत येऊन ठेपले. ते प्रेषित (स) यांचे पवित्र शव ताब्यात घेणारच होते. तेव्हा जॉर्डनचे सुलतान नुरूद्दीन जंगी याने आदरणीय प्रेषित (स) यांना स्वप्नात पाहिले. तो तीन दिवस सारखा आदरणीय प्रेषित (स) यांना स्वप्नात पहात होता. प्रत्येक वेळी प्रेषित (स) दोन माणसांच्याकडे बोट दाखवून फर्मावित होते की, "नुरुद्दीन, मला ह्या दोन माणसाच्या खोडीपासून वाचव."

ह्या स्वप्नामुळे नुरुद्दीनला विश्वास बसला की मदिना शहरावर नक्कीच काही संकट आले आहे. त्यामुळे प्रेषित (स) यांचा पवित्र आत्मा बेचैन आहे.

तिसऱ्या दिवशी सुलतान मदिना शहराकडे निघाला. त्याने बरीच संपत्ती बरोबर घेतली. मदिना शहरात पोहचल्यानंतर त्याने सार्वजनिक दान देण्याची घोषणा केली. सर्व लोक पैसे घेण्यासाठी आले. सुलतानने ही युक्ती ह्यासाठी केली की अशा प्रकारे त्या दोघांचा चेहरा ओळखला जाईल. ज्यांच्याकडे प्रेषित (स) यांनी स्वप्नात इशारा केला होता. परंतु ते दोघे दिसले नाहीत. सुलतानने विचारणा केल्यावर कळले की सर्व लोक आहे परंतु दोन अल्लाहवाले लोक आले नाहीत. हे दोन्ही सतत भक्तीमध्ये लीन असतात. म्हणूनच कुणालाही भेटत नाहीत. सुलतानने त्यांना हाजीर होण्याचा आदेश दिला. त्या दोघांना यावे लागले. सुलतानने त्या दोघांना ओळखले. ते दोघे तेच होते, ज्यांच्याकडे प्रेषित (स) सुलतान च्या स्वप्नात इशारा करत होते.

सुलतान त्यांच्या बरोबर त्यांच्या घरी गेला. त्यांचे घर बघितल्यानंतर असे वाटत होते की ते दोन्ही मोठे अल्लाहवाले आहेत. समोरच कुरआन आणि इतर धार्मिक ग्रंथ ठेवलेले होते. फरशीवर चटाई अंथरलेली होती. बादशाहाने चटाई उचलून पाहिली तर भयानक दृष्य पाहिले.

सुलतानने सर्व काही माहिती करून घेतली. त्या दोघांनी सांगितले की त्यांची स्कीम कोणती होती. त्यांनी सांगितले की आम्ही मदिनावासी लोकांच्या डोळ्यात धुळफेक करून तुमच्या प्रेषितांच्या कबरी पर्यंत पोहचणारच होतो. परंतु आकाशात अचानक ढग जमा झाले, सोसाट्याचा वारा सुटला आणि भूकंप झाला. आणि ह्यानंतर तुम्ही येथे आलात.

सुलतान हे ऐकून ओक्साबोक्सी रडू लागला. रागात उठला आणि दोन्ही पापींचे डोके एका झटक्यात धडावेगळे केले. त्यांचे शव अग्नीत फेकून दिले आणि प्रेषित (स) यांच्या कबरीच्या आजूबाजूला खोल खंदक खोदले आणि त्या खोल खाईत वितळलेले शीशे भरून टाकले जेणे करून यापुढे कोणी ही पापी अशा प्रकारे कुकर्म करण्याची हिम्मत करू नये.

प्रश्न : १) आदरणीय प्रेषित (स) यांच्या पवित्र शरीराविषयी पापी लोकांची काय स्कीम होती ?

२) अल्लाहने संरक्षणाची काय व्यवस्था केली ?

३) सुलतान नुरुद्दीन जंगीने कोणते स्वप्न पाहिले ?

४) त्याने छडा लावण्याची कोणती युक्ती केली ?

५) त्या दोन्ही पापी लोकांनी आपली स्कीम यशस्वी करण्यासाठी काय केले ?

६) नुरुद्दीन सुलतानने त्यांच्याशी कोणता व्यवहार केला आणि आदरणीय प्रेषित (स) यांच्या कबरीचे रक्षण करण्यासाठी काय केले ?

मूल्यपाठ क्रमांक १९

शिक्षणाची आवड

ज्ञान सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. तर अज्ञान मोठे दारिद्रय आहे.ज्ञानाविना मनुष्याची श्रध्दा आणि विश्वास दृढ होत नाही. ह्यामुळे मनुष्य चांगल्या कामाला सुध्दा मुकतो. म्हणूनच प्रत्येक मुस्लिमाला ज्ञान प्राप्त करणे अनिवार्य आहे. ज्यांना आपल्या श्रध्देची आणि निष्ठेची काळजी असते असेच आचरणाविषयी नेहमीच सतर्क असतात असा मनुष्य ज्ञान संपत्ती प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहातो. ज्ञान प्राप्ती मार्गात कितीही संकटे आलीत तर त्यांचा सामना असा मनुष्य करीत जातो.

इमाम बुखारी (रह) यांना आपण तर जाणता. त्यानी ज्ञान प्राप्त करण्यासाठी फार कष्ट झेलले होते. लांब लांबचा प्रवास केला. ह्यासाठी ते चौदा वर्षाचे असतानाच घरातून बाहेर पडले. बुखारा पासून ते इजिप्तपर्यंत खडतर प्रवास केला होता. जरा विचार करा की कुठे बुखारा आणि कुठे इजिप्त ! इतका लांबचा त्या काळातील खडतकर प्रवास करणे अशक्य प्राय होते. प्रवासात कधी कधी त्यांना खाण्यासाठी काहीच नसल्यामुळे ते कंदमुळं खात असत.

अशा स्थितीत सुध्दा इमाम बुखारी (रह) आपला प्रवास सुरुच ठेवत आणि त्यांच्या उत्साह कमी पडत नसे. त्यांना ज्ञानप्राप्तीची लालसा होती. म्हणूनच अल्लाहने त्याना ज्ञानाने मालामाल केले. ते श्रेष्ठ हदीस कथन व संकलनकार बनले.

प्रश्न : १) इमाम बुखारी कोण होते ?

२) ज्ञानप्राप्तीसाठी त्यांनी काय केले ?

३) ते लांब लांबचा प्रवास कशासाठी करत ?

४) त्यांच्या आवडीचे त्यांना कोणते फळ मिळाले.?